
भेजा फ्राय
लेखक - अनिल पिसे.

# भेजा फ्राय

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# भेजा फ्राय

लेखक

## अनिल औदुंबर पिसे

# भेजा फ्राय

लेखक... अनिल औदुंबर पिसे

पत्ता- 280 Pretoria Avenue Randburg Johannesburg South Africa-2194

मोबाईल नम्बर -+27676775593

anil.pise7@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ३ ऑक्टोबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मैं भगवान का भेजा हुं



मी बऱ्याच वर्षापासून लिहितोय परंतु पोस्ट करायचो ते फेसबुक वर आणि नोटबुक वर. जन्म पंढरपूरमध्ये एका " संतपेठ " नावाच्या झोपडपट्टीमध्ये झाला. फक्त नाव आहे " संतपेठ " परंतु एकही संत वासाला सुद्धा मिळणार नाही. मी सध्या भारताबाहेर रिसर्च करतोय; परंतु बालपणीच्या आठवणी ताज्या आहेत. शिक्षण (पि.एच.डी). कॉम्प्युटर सायन्स. मला विनोदी, भावनिक तसेच अध्यात्मिक लिखाण करण्याची आवड आहे. नाटक आणि स्टेज म्हणजेच सर्वस्व मानणारा मी एक कलाकार, लेखक आणि आजन्म विद्यार्थी असून तुम्हा सर्वांना माझे लिखाण आवडेल अशी अपेक्षा करतो.

खरे पाहिले तर मला लिखाणाचा कोणताही वारसा नाहीये परंतु शालेय जीवनापासून वाचनाची प्रचंड आवड होती. शिवाय शेजारी राहणारे सर्वच जण अशिक्षित असल्यामुळे कुणालाही आलेल्या पत्रापासून ते अगदी " सोळा सोमवार व्रत कथा ", " पोथी-पुराण " आणि बरेच काही मोठयाने वाचनाचे काम आवर्जून माझ्याकडे असायचे. हळू हळू शाळेतील गॅदरिंगमध्ये सहभाग घेतल्यामुळे आपण काहीतरी लिहू आणि सादर करु शकतो ह्याबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला. इयत्ता आठवीमध्ये असताना मी "आन्याचे पांडुरंगास पत्र" नावाचे एकपात्री नाटक लिहिले आणि सादर करून पहिले बक्षिस पटकावले.

तेंव्हापासून मी सतत काही-ना-काही लिहीत गेलो. शाळेतील ग्रंथालयात जे मिळेल ते पुस्तक वाचत असताना व. पु. काळे, शंकर पाटील, पु. ल. देशपांडे यांच्या लिखाणाची ओळख होत गेली. परंतु २००८ नंतर आवर्जून पुण्यात खास पुस्तके विकत आणण्यासाठी वर्षातून ३-४ खेपा होऊ लागल्या त्यातच विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, राजन खान ह्यांसारख्या दिग्गज लेखकांच्या पुस्तकांनी मनाला भुरळ

पाडली. बालपणी शेजारी राहणाऱ्या सर्व लोकांबद्दल असणाऱ्या आठवणी आणि वेगवेळया लोकांच्या वेगवेगळया वृत्ती मनात जशाच्या तशा साठलेल्या आहेत. भविष्यात पब्लिश करण्यासाठी ह्या सर्व पात्रांवर एक पुस्तक लिहितोय "संत पेठ टू साऊथ आफ्रिका" त्यामध्ये माझा “स्लम एरिया (SA) ते साऊथ आफ्रिका (SA) " हा प्रवास मांडणार आहे.

भेजाफ्राय-बद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया, बऱ्या किंवा वाईट, जाणून घ्यायला आवडतील.

अनिल औदुंबर पिसे.
anil.pise7@gmail.com
पत्ता- 280 Pretoria Avenue Randburg Johannesburg South Africa-2194
मोबाईल नम्बर -+27676775593

प्रस्तावना

-------------------

रसिक-वाचकांना नमस्कार

प्रतिलिपी मराठी या वेबसाईटवर आणि फेसबुकवर लेखन सक्रीय असणारे लेखक मित्र डॉ.अनिल पिसे वास्तव्यास दक्षिण आफ्रिकेत - जोहान्सबर्ग या शहरात असतात साहित्यलेखन या समान आवडीनेमित्र म्हणून आम्हाला जवळ आणले आहे.

व्हाट्सअप्पवर बोलतांना ते म्हणाले की माझ्या मित्रांना वाटत असते की - मी माझ्या विनोदी लेखनाचे इ- बुक करावे.

ते म्हणाले कव्हर वगैरे तयारी झाली आहे आता फक्त माझ्या या पुस्तकाच्या प्रस्तावने बद्दल विचार करतोय पण. काही सुचत नाहीये तुम्ही थोडे मार्गदर्शन केल्यास बरे होईल. त्यानुसार अनिल पिसे यांना म्हणलो मी काही मोठा साहित्यिक वगैरे नाही पण मी प्रास्तविक लिहिले तर चालेल का? माझ्या या सूचनेने त्यांना धीर आला आणि लेखक-मित्र डॉ.अनिल पिसे यांच्या "भेजा फ्राय " पहिल्या इ-बुकबद्दलचे हे प्रास्तविक-

या संग्रहाच्या शीर्षकातून या कथा विनोदी -बाजाच्या आहेत .हा केलेला अंदाज या कथांचे वाचन करतांना उलगडत जातो .

या ई-संग्रहातील - सहा कथा वाचून लेखक- डॉ.अनिल पिसे यांच्या लेखनाबद्दल म्हणता येईल की-

त्यांची लेखन शैली विनोदी लेखनास अनुकूल आहे "पण हे असे लेखन अधिक प्रभावीपणाने साध्य होण्यास लेखन-साधना करावी लागणार आहे.

प्रस्तुत कथांबद्दल लेखक सांगतो की ही एक कथा मालिका आहे .अर्थातच या सगळ्या कथेला एक संदर्भ-सूत्र आहे जे आलटून-पालटून या सगळ्या कथेतून आपल्याला कळत जाते.

या कथा मालिकेतल्या दोन प्रमुख-व्यक्ती रेखा गोरे -साहेब आणि त्यांचा ऑफिसमधील एक सहाय्यक,जो गोरेसाहेबांचा मित्र आहे, तो सतत त्यांच्या सोबत असतो.

या विनोदी शैलीच्या लेखनातून लेखक डॉ.अनिल पिसे हे-सभोवतालचे वर्णन, -व्यक्ती -स्वभाव, वृत्ती- प्रवृत्ती, स्वताच्या

फायदाच विचार करणारी माणसे, त्यांचा बेरकीपणा, मतलबीपणा आणि व्यक्ती नमुने सविस्तर वर्णनातून, प्रसंगातून पेश करतात.

प्रसंग कोणताही असो, माणसे आपल्या स्वभावनुसार वागत असतात यावर लेखक सतत भाष्य करतो .ते मार्मिक निरीक्षण आहे.

गोरे साहेब आणि त्यांच्या मित्राच्या विविध उपक्रमांची लांबलचक अशी ही विनोदी कथा मालिका आहे .

कथेत अनेक व्यक्तिरेखा आहेत, त्यांची या कथा खुलण्यास छान मदत झाली आहे.

काही कथा शिर्षक -

१.नसते लघु -उद्योग,

२.गुलाबी पायजमा,

३.सेल्फी विथ स्वीट कोर्न,

४, कोकम अशा काही कथा आहेत . या सगळ्या कथेत हास्यास्पद घटनेतून हास्यनिर्मिती करण्याची लेखक अनिल पिसे यांची लेखन धडपड कौतुकास्पद आहे.


नव्या पिढीच्या “ मिंगलीश " भाषेचा सढळ उपयोग या लेखनात केलेला आहे, आगामी लेखनात सहज मराठी असावे "असा प्रयत्न करावा, जेणे करोन लेखन खुमासदार वाटेल अशी आपलेपणाची सूचना करतो.

“भेजा-फ्राय" या मिस्कील शैलीतल्या ई -बुक कथासंग्रहाबद्दल लेखक डॉ.अनिल पिसे यांचे अभिनंदन व पुढील लेखनास शुभेच्छा .

-अरुण वि.देशपांडे
लेखक-कवी
पुणे.
9850177342

## अर्पणपत्रिका

**सहजयोगाद्वारे आत्मसाक्षात्कार देऊन माझ्या आयुष्याचं मूल्य समजण्यास योग्य मार्ग दाखवून सदैव प्रेरणा देणाऱ्या सहजयोगाच्या संस्थापिका ...**
**आदिशक्ती श्री. माताजी निर्मला देवी यांच्या निर्मल चरणी कृतज्ञता पूर्वक अर्पण...**



**कथानुक्रम**

नसते लघु-उद्योग

गुलाबी पायजमा,

गंडलेले छोले-भटुरे

आयर्न मॅन आणि सेल्फी विथ भागवत!

सेल्फी विथ स्वीट कोर्न,

कोकम

अस्विकरण

*या कथासंग्रहातील सर्व कथा  काल्पनिक असून त्यातील सर्व प्रसंग, व्यक्ती व स्थळे पुर्णपणे काल्पनिक आहेत. यातून कोणाही व्यक्ती वा समूहविशेषाला दुखावण्याचा हेतू नाही. तरीही कोणाला यात काही साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.*

# नसते लघु-उद्योग




"ओ शुक शुक, मी तुम्हाला एक suggestion देऊ का? " हे वाक्य जेंव्हा गोरे साहेबानी कारमधून तोंड बाहेर काढून त्या टोल नाक्यावरील केबिनमध्ये बसलेल्या माणसाला फेकून मारले तेंव्हा त्या माणसाचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता.

आमच्या साहेबांच्या चेहऱ्यावरचे अविर्भाव पाहून त्या केबीनमध्ये बसलेला आडाणी माणूस अजिबात इच्छा नसतानाही, " बोला साहेब काय झालं? " असे म्हणाला.

अहो, टोल चे ६२ रुपये झाले होते आणि आमच्याकडून तुम्ही ७० रुपये घेतले व ८ रुपये चिल्लर नाहीयेत म्हणून त्याचे चोक्लेट्स दिले बरोबर?

हो " बरोबर ", "आम्ही रोज-रोज चिल्लर कुठून आणायची त्यामुळे आम्ही सर्वांनाच उरलेल्या पैस्याचे चॉकलेट्स देतो ", त्यात काही नवीन नाहीये !.

त्यावर साहेब म्हणाले, " तुमच्याकडे चिल्लर ची कमतरता आहे, हे मला मान्य आहे. परंतु उरलेल्या पैस्यांच्या बदल्यात तुम्ही चॉकलेट्स देता हे मला अजिबात मान्य नाहीये ".

साहेबांचे बोलणे ऐकून तो केबीन मधला माणूस जरा गोंधळात पडला आणि वैतागून म्हणला, "ओ साहेब, तुम्ही आमच्या मॅनेजरला भेटून तुम्हाला काय मान्य आहे आणि काय मान्य नाही ह्याबद्दल सविस्तर तक्रार करा ".

साहेब म्हणाले,"अरे बाबा मी काय म्हणतोय ते ऐकून तरी घे".

बर सांगा, काय आहे तुमचे " सजेशन "?, आणि निघा लवकर इथून आम्हाला आमचे काम करू द्या. " न जाणे कहा कहा से आते हैं ! ".

आता साहेब पण जरा चिडून म्हणाले, "अहो चॉकलेट देण्यापेक्षा तुम्ही ड्राइवरला " ड्राय फ्रुट्स " देत जा, पौष्टीक असतात ". तो समोरचा माणूस विचित्र तोंड करून म्हणाला काय? ?

हो खरं तेच बोलतोय, " तसेही तुम्ही दिलेले फालतू चॉकलेट्स, मला नाही वाटत कुणी खात असेल".

मी आपला गप्प बसून होतो . कारण, मला साहेबांची सजेशन फेकून मारण्याची सवय मागील ५ वर्षांपासून माहिती होती.

ह्यांचे हे सजेशन फेकून मारण्याचे काम सुरु असताना आमच्या कारच्या मागे गाड्यांची भली मोठी रांग झाली होती पण ह्या माणसाला त्याच काहीही पडलं नव्हतं.

आता मात्र केबिनमध्ये बसलेला माणूस इतका भडकला होता कि, त्याच्या हातात जर एखादी तलवार असती तर त्याने

ह्या गोरे साहेबांची जीभच कापून टाकली असती. परंतु ह्या आमच्या साहेबांना समोरच्या माणसाच्या रिॲक्शन्स शी काहीही देणे-घेणे नव्हते. सरळ-सरळ त्या माणसाच्या तोंडाकडे दुर्लक्ष करून त्याला, "ड्रायविंग करताना ' ड्राय-फ्रुट्स ' खाण्याचे फायदे " ह्या विषयावर गोळया झाडण्याचे काम सुरु होते.

काय लफडा सुरु झाला आहे, हे पहायला तिथे हळू-हळू आजूबाजूचे लोक जमा होऊ लागले. जमलेले लोक साहेबांच्या निरर्थक बोलण्याला २ मिनिटातच कंटाळून मलाच सांगू लागले की, घेऊन जा ह्या साहेबांना उगी कशाला तमाशा लावलाय.

त्यावर साहेब म्हणाले, "तमाशा आम्ही नाही ह्यांनी लावलाय, "मागच्या शनिवारी दिलेले चॉकलेट कारमध्ये पघळून गेले बघा जरा डोळे उघडून". तुम्ही जर चॉकलेट ऐवजी "बदाम-अक्रोड-काजू" ह्यांपैकी काहीही एक दिले तर ड्राइवरला गाडी चालविताना झोप लागणार नाही आणि त्यामुळे रस्त्यावरील अपघातांची संख्या कमी होईल.

तुमच्याकडून ड्रायफ्रूट्स दिल्यामुळे किती देशहिताचे आणि पुण्याईचे काम होईल हे तुमच्या लक्षात येतेय का? "

साहेबांनी कुठला विषय कुठे नेलेला पाहून शेवटी तो टोलनाक्यावरचा माणूस, " साहेब आमचं चुकलं आम्ही तुमच्या पाया पडतो कृपया गाडी पुढे काढा. कारण, मागून लोक हॉर्न वाजवून एकमेकांच्या कानाचे पडदे फाडत आहेत ". शिवाय तुम्ही म्हणताय त्याप्रमाणे समाजातील लोकांच्या कानाचे पडदे फाटू नये यासाठी मदत करणे आपले कर्तव्य च आहे ना? . मी तुम्हाला शब्द देतो, आम्ही इथून पुढे तुम्ही सजेशन दिल्याप्रमाणे, " काजू-बदाम-पिस्ता-अक्रोड-मस्तानी " हे सर्व ठेवतो. आता आमच्यावर उपकार करा आणि निघा इथून पाहिजे तर तुमचे टोल चे घेतलेले पैसे हि परत देतो. शेवटी तो मला उद्देशून म्हणाला, " काय राव तुम्ही जरा ठीकठाक दिसत आहात घेऊन जा ना ह्या हाफ म्याड माणसाला ". साहेब हाफ नाही फुल म्याड असल्याची जाण असूनही मी त्याला म्हणालो, "ये तोंड सांभाळून बोल साहेब आहेत ते माझे ."

इतक्यात त्या नाक्यावरील फळ विक्रेते, बिसलरी बाटल्या विकणारे सर्वजण तिथे जमा झाले. त्या गर्दीतील पेरू

विकणाऱ्या पोरांनी साहेबांना पाहता क्षणीच ओळखलं आणि ते अंगावर येतच ओरडू लागले, " अरे हा तर तोच वेडा माणूस आहे, मागे आपल्या हातून मार खाता-खाता पळून गेलेला, पकडा ह्याला ह्या वेळेला साल्याला सोडू नका". त्यांचा राग पाहून मी पण पुरता घाबरून गेलो, अहो साहेब हे काय अजून नवीन लफडे? आता हे फळवाले तुम्हाला का मारायचं म्हणतायत? त्यावर साहेब म्हणाले ती एक मोठी स्टोरी आहे निवांत झाल्यावर सांगतो.

माझ्या मनात एका क्षणासाठी विचार आला की, " उगी ह्या माणसाच्या सोबत का आलोय आपण?, साला ह्याने स्वतःच्या बदनामीचा ठेका तर उचललेलाच आहे परंतु आता सोबत असणाऱ्या माणसाची सुपारी पण घेतलीय की काय? ".

शेवटी घाबरून मीच अहो साहेब चला आपल्याला उशीर होतोय अशी विनंती करून, मी त्या टोल नाक्यावरून आमची गाडी पुढे घेण्यासाठी कसेतरी ह्या माणसाला भाग पाडले. खरे तर त्या पेरू वाल्यांचे उपकार म्हणावं लागेल ते नसते आले तर अजून ह्यांचे " ड्राय-फ्रुट " पुरान संपायला तासभर तरी निश्चितच लागला असता.

त्यादिवशी माझ्या लक्षात आले कि, ह्या माणसाला कुठे, कधी आणि कोणत्या विषयावर अन किती वेळ बोलावे हे माहिती नाहीये. त्यांचा स्वभावच निर्लज्जम सदा सुखी..!!! असा झालाय आणि स्वभावाला औषध नसते त्यामुळे हा माणूस स्वतःच्या मेंदूमध्ये असणाऱ्या गोष्टी " सजेशन " च्या नावाखाली आजूबाजूच्या माणसावर शिंपडत फिरतोय.

परंतु अजूनही मला त्या पेरूवाल्याचं आणि साहेबांचं का बिनसलं होत ह्याबद्दल काहीही माहिती नव्हते. मी आता माझ्या मनाशी ठरविले होते की, इथून पुढे आपल्याला कितीही तहान किंवा भूक लागली तरीही गाडी थांबवू द्यायची नाही, कारण हा माणूस ह्याचे " सजेशन " चे दुकान सुरु करून आपल्याला गोत्यात आणेल.

शेवटी थोडेफार अंतर पुढे गेल्यावर साहेबांनीच ते पेरूवाले त्यांच्यावर का वैतागले आहेत हे सांगण्यास सुरुवात केली. म्हणे मागे २-३ वर्षांपूर्वी ह्यांच्या एका मंत्रालयात काम करणाऱ्या मित्राला " मुख्यमंत्री लघु उद्योग सबसिडी अनुदान योजना " ह्या प्रोजेक्ट वर काम करायचं होत त्यामुळे त्याने ह्यांची मदत मागितली होती. तेंव्हा हे साहेब रात्रदिवस, " लघु

उद्योग " करणाऱ्या लोकांना पकडून-पकडून ह्या योजनेबद्दल सांगत होते परंतु ह्यांच्या सांगण्याच्या पद्धतीला घाबरून लोक ही " सबसिडी/अनुदान " चा लाभ घेण्यासाठी परत येण्याची हिम्मत करत नसत.

बघता बघता २-३ महिने गेले परंतु कुणीही हि योजना घेण्यासाठी साहेबांकडे येत नाहीये असे लक्षात आले, घरातील लोकही वैतागून गेले होते, कारण साहेब रोज छोट्या-छोट्या ' दुकानवाल्याना ' आजूबाजूच्या ' व्यवसायिकांना ' घरी बोलवून प्रोजेक्टर वर स्लाइड्स लावून त्या योजनेबद्दल सांगून त्रास देत होते. हो ! " त्रासच देत होते ", कारण साहेब जे सांगत होते त्यातील एकही अक्षर कुणालाही समजत नसे, त्यांचे इंग्लिश सर्वांच्या डोक्यावरून जायचे. शेवटी जाताना चहा-पाणी घेऊन झाल्यावर लोक साहेबांच्या बायकोला, "तुमच्या नवऱ्याला आवरा जरा " असा गोड सल्ला द्यायचे. त्यामुळे बायकोने शेवटी त्या योजनेबद्दल एकही शब्द घरात बोलायचा नाही ! जर योजनेचा विषय काढला तर, " मी कायमच माहेरी निघून जाईन " असा साहेबांना दम दिला.

परंतु साहेबांच्या डोक्यातून एखादे घेतलेले काम काढून टाकणे म्हणजे काही सोपे काम नव्हते अर्धवट काम सोडून देणे हे त्यांच्या नियमांत बसत नव्हते . साहेब हे योजनेचं काम करतच राहिले आणि त्यासाठी त्यांनी " कोड-वर्ड " वापरण्यास सुरुवात केली. त्यावेळी रोज बऱ्याच लघु-उद्योग करणाऱ्या लोकांना भेटून आल्यावर रोजच्या updates बद्दल मित्राला सांगताना, आज ८ लोकांची " गेम केलीय ", आता उद्या ६ लोकांची " गेम करायला जायचं आहे " लिस्ट तयार आहे आपल्याकडे, असे काही तरी बोलायचे .

आता इथे " गेम करायला जायच आहे " याचा त्यांनी ठरविलेला अर्थ किंवा कोड-वर्ड असा होता की, " मुख्यमंत्री लघु उद्योग योजना " ह्याबद्दल माहिती द्यायची आहे. मग काय नेहमीच फोन वर सुद्धा सहजच बोलायचे झाले की, आज पुण्यातील, " १५ लोकांची गेम करून आलोय " तू किती जणांची " गेम केली " मुंबईत आज?

पुढे साहेब म्हणाले की, त्यांना आता " गेम करायची आहे, आपली " ' हत्यारे ' संपत आली आहेत ", नवीन " लिस्ट

रेडी आहे " . हे असले शब्द रोजचेच झाले होते, ती " गेम ची भाषा " जणू त्यांच्या अंगवळणीच पडली होती.

परंतु शेवटी ते म्हणाले की, माहिती नव्हते की, ह्या " कोड-वर्ड "मध्ये बोलण्याची आम्हाला इतकी मोठी भरपाई द्यावी लागेल. ह्या असल्या गुंडगिरीच्या शब्दकोशामुळे मी आणि माझा तो मंत्रालयात काम करणारा मित्र कायमचा दुरावेल ह्याची आम्हाला कल्पना नव्हती.

ह्यांच्या कोड-वर्ड च्या अति वापरामुळे काय झाले असेल ह्याची मला थोडीफार कल्पना येऊ लागली होती. त्याचे असे होते की, " साहेबांच्या मनात काय नसायचे ते आपले चांगल्या हेतूने लोकांना मदत करायला जायचे परंतु त्यांच्याच ते नेहमी अंगलट यायचे ". इथेही तसेच काहीतरी झाले होते हे नक्की .

मागे एकदा साहेब आणि त्यांचा तो मंत्रालयात काम करणारा मित्र ह्याच टोल नाक्या जवळ लाईनमध्ये असताना भूक लागली म्हणून सहज पेरू विकत घेत होते. पेरू खरेदी करत असताना अचानक साहेबांच्या डोक्यात आले की, अरे हे पेरू विकणारे सुद्धा " लघु उद्योग " च करत आहेत. शिवाय बरेच जण दिसत आहेत तर चला मग काही हरकत नाही ह्यांची गेम

करून टाकू. त्यांचा मित्रही म्हणाला, हो ! चालेल ना. "आपल्याला काय कुणाला तरी ते अनुदान घ्यायला भाग पाडायचे, मग तो पेरू विकू दे नाहीतर फुटकळ दारू... आपले काम काय तर ती योजना समजून सांगणे ".

साहेबांनी त्या लहानग्या पेरू विकणाऱ्या पोराला विचारले, "काय रे तुम्ही कितीजण आहात पेरू विकायला? ". पोराला काही कळेना, तो म्हणाला, " का? काय झालं साहेब? " . अरे, " तुम्ही टोटल किती जण आहात? " तो म्हणाला १५-१६ जण आहोत . त्यावर साहेब सहजच सोबत असणाऱ्या मित्राला म्हणाले, "चला आज ह्या सर्व १५-१६ जणांना एकत्रित बोलवून ह्यांची आजच गेम करून टाकू ". ते पोरग घाबरलं त्याला साहेबांच्या तोंडाकडे पाहून घाम फुटला. पुढे साहेब मित्राला म्हणाले, " आपली सर्व हत्यारे आणली आहेत ना एकजणही वाचलं नाही पाहिजे सर्वांची गेम झाली पाहीजे? ". आजच आपलं टारगेट, " पेरूवाला गेम " नावाने कंप्लिट करून टाकू चला काढा आपली हत्यारे बाहेर. साहेबांना किंचितही कल्पना नव्हती की, हे प्रकरण अंगलट येईल आणि आयुष्यभर " टोल जवळ केलेला झोल " लक्षात राहील.

ते पेरूवाल पोरग हत्यारांच नाव ऐकून तिथून पळत सुटलं आरडाओरड करून त्याने त्याच्या सर्व साथीदारांना एकत्रित करून घडलेला प्रकार सांगितला. आता त्या जमलेल्या पेरूवाल्यांपैकी कितीजण नशेत नव्हते ते देवच जाणे. त्याला ते तर काय करणार बिचारे, दिवसभर उन्हात उभे राहून पेरू विकणे म्हणजे थोडाफार दारू/गांजा ह्यांचा नशा असल्याशिवाय शक्यच नाही. .

खरे तर साहेबांना इथे " हत्यारे " म्हणजे ती फालतू योजना समजून सांगण्यासाठीची फाईल / पॅम्प्लेट्स म्हणायचं होत. त्या पेरूवाल्या पोराने बाकीच्या त्याच्या सर्व साथीदारांना एकत्रित करून साहेबांबद्दल काय सांगितले देव जाणे. एकतर त्या पेरूवाल्यांपैकी बरेच जण गांजा किंवा दारू ढोसलेले होते त्यातील क्वचित एखादाच नशेत नव्हता. मग काय फुल्ल टाकून असलेले आपले ते १५-१६ पेरूवाले पहेलवान काठ्या-कुऱ्हाडी घेऊन साहेबांच्या कार पुढे उभे ठाकले. समोर उभे असणाऱ्या गॅंगला पाहून गाडीत बसलेल्या साहेबांना आणि त्यांच्या मित्राला काहीच समजलं नाही. शिवाय त्या पेरूवाल्या अडाणी पोरांनी त्यांना बोलायचा चान्सच दिला नाही, डायरेक्ट

हमला सुरु केला. गाडीच्या काचा फोडून दगडे मारण्यास सुरुवात केली. नशीब पोलिसांनी मध्यस्ती केल्यामुळे कसातरी जीव वाचवून साहेब आणि त्यांचा मित्र तिथून निसटून आपल्या-आपल्या घरी पोहचले. त्यादिवशी पासून साहेब आणि त्यांचा मित्र " कोड-वर्ड " च सोडा "नॉर्मल वर्ड "मध्येही एकमेकांशी बोलत नाहीत.

## " गुलाबी पायजमा "




माझ्या माहितीप्रमाणे जागतिक पातळीवर, सायकलिंग वीक, वूमन्स वीक, वाइल्ड लाइफ वीक, वैलेंटाइन वीक हे मोठ्या प्रमाणात साजरे केले जाणारे वीक आहेत. निश्चितच इंडियामध्ये स्वतःच्या गरजेनुसार हे वीक साजरे करण्यामागचे उद्दीष्ट्ये प्रत्येक ठिकाणी बदलले जाते. बऱ्याच वेळा असे निदर्शनास येते की, आपल्या ऑफिस मधील काही ' नमुने ' दिलेले काम सोडून " एक्स्ट्रा-करिकुलर एक्टिविटीज " च्या

नावाखाली बाकीच्या गोष्टीं करण्यात अगदी मनापासून व्यस्त असतात. त्यामध्ये बिनकामी साहेब लोक आपण ऑफिसमध्ये काहीतरी वेगळ्या प्रकारचे दिवे लावतोय हे दाखवण्यासाठी कोणतेही ' डे ' साजरे करण्यास परवानग्या देत राहतात. जास्तच दिखावा करायची सवय असल्यामुळे काही अतिउत्साही ' कामचुकार ' लोक 'डे ' ऐवजी अक्खा वीक साजरा करताना पहायला मिळतात. असो, ज्याची-त्याची काम करण्याची सवय... आपण याठिकाणी आमच्या गोरे साहेबांनी जागतिक " स्वछता वीक " कसा साजरा केला ते पाहू.

गोरे साहेबांच्या फुकटचे सजेशन देण्याच्या धंद्यामुळे पुण्यातील बऱ्याच ठिकाणी चांगल्या ओळखी आहेत. साहेबांना जागतिक " स्वछता वीक " निमित्त ' विद्यार्थी दशेत स्वच्छतेचे महत्व ' ह्या विषयावर व्याखाने देण्यासाठी बरीच निमंत्रणे आली होती. अजिबात इच्छा नव्हती तरी देखील त्यांच्यासोबत फिरायची आणि विनाकारण त्यांचं भाषण ऐकण्याची वेळ माझ्यावर आली होती. तर साहेबांचं पहिलं भाषण पुण्यातीलच एका नामवंत विद्यापीठाच्या मुलांच्या हॉस्टेलमध्ये आयोजित करण्यात आले होते . त्या कार्यक्रमास

आम्ही वेळेत पोहचलो होतो, आज साहेब एखाद्या मंत्र्यासारखे दिसत होते कारण त्यांनी पांढऱ्या शुभ्र रंगाचा नवीन कुर्ता-पायजमा परिधान केला होता. कार्यक्रम सुरु झाला अजून २ लोकांची भाषणे झाली की, साहेबांचा नम्बर होता.

आम्ही दोघेजण बसताना शेजारीच बसलो होतो. परंतु अचानक शेजारी बसलेले गोरे साहेब कुठे गायब झाले काही कळायला मार्ग नव्हता. सुरुवातीला वाटले खिशात लिहून आणलेला भाषणाचा कागद वाचत बाहेर उभे असतील, येतील थोड्या वेळात... पण बराच वेळ साहेब आलेच नाहीत . आता आयोजक सुद्धा साहेबांचं नाव पुकारू लागले पण तरीही साहेबांचा कुठून रिप्लाय येईना . नशीब, पुढील २-३ मिनिटात अचानक साहेब स्टेजवर आले आणि एकदाची त्यांचं फालतू व्याख्यान सुरु झालं. अचानक माझी नजर साहेबांच्या कपड्यांवर गेली, नक्कीच काहीतरी गडबड झाली आहे हे माझ्या लक्षात आले . कारण अंगावर सकाळी परिधान केलेला पांढरा कुर्ता होता परंतु पायजमा नव्हता . अहो नव्हता म्हणजे सकाळवाला पांढऱ्या रंगाचा नव्हता, बदललेला पायजमा चक्क गुलाबी रंगांचा (स्पायडर मॅन च्या पॅन्ट ) सारखा दिसत

होता. मला ह्यांच्या कपड्यांचा कलर चेंज कधी, कसा आणि कुठे झाला हे अजिबात समजलं नाही. शिवाय कपड्याच्या कलरचे कॉम्बिनेशन इतके गावंढळ दिसत होते की, खरंच त्यांच्याकडे पाहवत नव्हते. तो त्यांचा जोकर सारखा अवतार मुलांच्या लगेच लक्षात आला, एकतर ह्या कार्यक्रमाला हॉस्टेल ची पोर रेक्टर ची मर्जी राखण्यासाठी नाईलाजाने बसली होती. होस्टेलच्या पोरांचं वय मस्ती करण्याचं होत, पोर एखाद्या संधीची वाटच पाहत होती. त्यातून ही संधी समोरून चालून आली होती त्यामुळे त्या संधीचा बरोबर फायदा पोरांनी उचलण्यास सुरुवात केली ! पोरांमध्ये बरेच शीघ्र कवी बसले असावेत दोनच मिनिटात एक गाणे तयार करून पोर मोठमोठ्याने गाऊ लागले,

" पांढऱ्या रंगाचा बगळा, त्याचे गुलाबी रंगाचे पाय !

अहम भाग्य हे आपुले, वाजवा टाळ्या पाहताय काय !

बगळा देतोय, स्वच्छतेवर भाषण हाय-फाय, भाषण हाय-फाय !! ".

साहेबांनी परिधान केलेला बगळा ड्रेस पाहून हॉस्टेल मधल्या पोरांना गोंधळ घालण्यासाठी एक फुकट विषय

मिळाला आहे याची आयोजकांना कल्पना आली. कदाचित आत्तापर्यंत झालेली सर्व भाषणे रटाळ झाली होती आणि अचानक समोर जोकर आला. मग काय पोरांनी इतका दंगा केला की, आयोजकांना सुद्धा असे वाटू लागले की, कुठून दुर्बुद्धी सुचली आणि ह्या माणसाला आमंत्रण दिले. समोर बसलेली सर्व मुले आऊट ऑफ कंट्रोल झाली !... कुणी, "ये बगळ्या " म्हणून ओरडायचे तर मधूनच सर्वजण खूप टाळ्या वाजवायचे. परंतु कसल्याही आवाजामध्ये आमच्या साहेबांच्या भाषण देण्याच्या प्रक्रियेला विचलित करण्याची ताकद नव्हती. स्वभावाप्रमाणे आपण देतोय ते भाषण, कुणाला आवडतंय का ह्याबद्दल काहीही देणे-घेणे नसलेले आमचे साहेब पोरांच्या टाळ्यांना उत्तम प्रतिसाद समजत होते. खरे तर, ह्या सर्व गोंधळात गोरे साहेबांचे भाषण त्यांच्या स्वतः व्यतिरिक्त कुणालाही ऐकू आले नव्हते. साहेबांचं व्याख्यान संपल्यावर बाकीच्या उरलेल्या वक्त्यांची भाषणे आयोजकांनी जास्त राडा नको म्हणून चक्क रद्द केली. साहेबांना औपचारिकता म्हणून पुष्पगुच्छ देऊन आभार काय व्यक्त केले, तर साहेबांचा नेहमीप्रमाणे गोड गैरसमज झाला. त्यांना नेहमीप्रमाणे हेच वाटले की, त्यांच्या अमूल्य अश्या भाषण शैली मुळे सर्वजण



त्यांचे कौतुक करत आहेत. असो

कसातरी तो कार्यक्रम पार पडला, आता, " साहेबांसमोर कुणी गीता वाचावी? " म्हणून मी पण, "खूप सुंदर-अप्रतिम भाषण " या सारखे शब्द साहेबांच्या तोंडावर फेकून मारले एकदाची. सर्व आयोजकांना भेटून झाल्यावर साहेब आणि त्यांचा वाढलेला कॉन्फिडन्स सोबत घेऊन त्या विद्यापीठाच्या परिसरातून आम्ही बाहेर पडलो.

थोडे अंतर पार झाल्यावर मी साहेबांना विचारलं, सर तुमचे कपडे तुम्ही कधी आणि कुठे बदलून आलात?

ते म्हणाले, " अरे ह्या बदललेल्या वस्त्रांमुळेच मुलांना माझे भाषण आवडले. मला तर वाटते आजच्या यशाचे श्रेय ह्या गुलाबी रंगाच्या पायजमाला द्यायला पाहिजे ".

मी उत्सुकतेपोटी विचारले यशाचे श्रेय पायजमा ला? का बरे असे का?

अरे, तो पायजमा परिधान करण्याआधी मी खूप अस्वस्थ होतो कारण आज " पहिल्या दिवशीचे भाषण कसे होणार? " ह्याचे मला थोडे टेन्शन होते, परंतु ज्या क्षणी मी हा लकी पायजमा परिधान केला, तेंव्हापासून मी फुल्ल कॉन्फिडन्ट बनलो रे !.

सर जी, " तुम्ही काय बोलताय मला काही समजत नाहीये, खरे तर हा गुलाबी रंगाचा लकी पायजमा तुम्हाला भेटला कुठे? जरा सविस्तर सांगाल का जरा? ".

अरे तुला तर माहिती आहे, " मला माझ्या शुगर च्या प्रॉब्लेम मुळे सारखं एक नम्बरला जावं लागत. आज माझे भाषण सुरु झाल्यावर ती वेळ येऊ नये म्हणून मी पाणी पिण्याचे आवर्जून टाळले होते. पण अचानक माझ्या भाषणाची वेळ जवळ आल्यावर मला अस्वस्थ वाटू लागले... कारण माझी एक नम्बरला जायची वेळ झाली होती . त्यामुळे मी वॉशरूम च्या शोधात हॉस्टेलमध्ये शिरलो ".

मला वाटलेच असेच काहीतरी असणार... त्यामुळेच मला न सांगता तुम्ही बाहेर गेलात . पण ही पायजमा कुठून मिळाली?

सांगतो ! मी त्या हॉस्टेल च्या वॉशरूममध्ये गेलो, परंतु हे असले नाडी असणारे कपडे बापजन्मी वापरले नव्हते. त्यामुळे माझ्या पायजम्याची नाडी सुटण्याऐवजी घट्ट झाली. तिकडे भाषणाची वेळ जवळ आली होती आणि त्याच वेळी इकडे माझे " नाडीयुद्ध " सुरु झाले होते.

अरे देवा... ! सर मग पुढे काय केले तुम्ही?

अरे काय करणार, " कुणी मदतीला भेटतंय का हे शोधले परंतु सर्व विदयार्थी कार्यक्रमाला गेले असल्यामुळे कुणीही सापडेना. शेवटी परमेश्वर कृपेने एकजण सापडला ".

त्या होस्टेलच्या जिन्याखाली एक " भागवत खोबने " नावाचा पोरगा इस्त्री चे दुकान चालवितो, तो तिथेच गावठी दारू पिऊन झोपला होता . त्याला उठवून माझ्या प्रॉब्लेम बद्दल सांगितले, त्या बिचाऱ्याने थोडा प्रयत्न केला पण नाडीची गाठ काही सुटायचं नाव घेईना. शेवटी माझ्या नावाच्या Announcement ऐकू येऊ लागल्या... तेंव्हा मात्र नाडी कापण्याव्यतिरिक्त आमच्याकडे एकही पर्याय उरला नव्हता. आता हे प्रकरण संपवून मला स्टेजवर जाणे गरजेचे होते... म्हणून पायजम्याची नाडी भागवत नी कापून टाकली. आता

नाडी परत एड्जस्ट करायला वेळ नव्हता... त्यामुळे भागवत नी मला त्याच्या दुकानातील कस्टमर ची हाताला येईल ती पायजमा दिली.

बापरे... ! सर किती प्रकारची संकटे पार करत तुम्ही शेवटी भाषणाला हजेरी लावलीत... म्हणजे खरंच त्या भागवत खोबण्यांनी दिलेला 'गुलाबी पायजमा ' तुमच्यासाठी लकी होता.

ते म्हणतात ना, "शो मस्ट गो ऑन ! ".

पण सर हा स्पायडर मॅन च्या पॅन्ट सारखा पायजमा तुम्हाला शोभत नाही, त्याला त्याचा पायजमा परत देऊन टाका.

आता भागवतला पायजमा जागतिक " स्वछता वीक " पूर्ण झाल्याशिवाय परत द्यायचा नाही. तसेही त्या दारुड्या भागवतला आपला पत्ता कुठे माहिती आहे? आठ दिवसांनी देऊन टाकू त्याला त्याचा पायजमा परत.

आता साहेबांच्या ह्या घेतलेल्या पक्क्या निर्णयापुढे मी तर काय बोलणार? मी आपला गप्प बसून नेहमीप्रमाणे तमाशा पाहत राहिलो.

पुढील ८ दिवस गोरे साहेब तो लकी " गुलाबी पायजमा " दररोज परिधान करत होते... त्याचा वास सुटला तरी ह्या माणसाने तो पायजमा काढलाच नाही. शिवाय मला माझी अजिबात इच्छा नसताना देखील ह्या अस्वछ माणसाबरोबर " विद्यार्थी दशेत स्वच्छतेचे महत्व " ह्या विषयावरील व्याखान ऐकत फिरावं लागलं ! सॉरी... जागतिक " स्वछता वीक " साजरा करावा लागला.

# " गंडलेले छोले-भटुरे "



जागतिक " स्वछता वीक " मधला आज चौथा दिवस मागील ३ दिवस गोरे साहेबांसोबत वेगवेगळया ठिकाणी त्यांचे गलिच्छ व्याख्यान ऐकून वैताग आला होता. मी नऱ्हेमध्ये राहतो आणि साहेबांचे भाषण आज कात्रज जवळील भारती विद्यापीठमध्ये सकाळी ९.३० ते १० ह्या वेळेत आयोजित केले होते. आज सकाळी ८.३० पर्यंत ते माझ्या घरी येणार होते आणि इथूनच आम्ही भारती विद्यापीठ कडे निघणार होतो. परंतु त्यांना घरातून निघायला उशीर झाल्यामुळे, "आपण डायरेक्ट भारती विद्यापीठला भेटू " असा त्यांचा मेसेज आल्यामुळे आम्ही ठरलेलेल्या वेळेत कार्यक्रम स्थळी भेटलो. परंतु समोर

पाहिलं तर, आयोजकांनी हॉलच्या बाहेर असणाऱ्या नोटीस बोर्ड वर आजचा कार्यक्रम काही अपरिहार्य कारणांमुळे २ तास उशिरा सुरु होईल असे लिहून ठेवले होते . आता पुढील २ तास काय करायचे हा यक्ष -प्रश्न माझ्यासमोर होता. मी ह्याच एरियामध्ये राहतोय त्यामुळे इथे थोडेफार लोक मला ओळखतात त्यामुळे ह्या अर्धवट माणसाला कॅम्पस च्या बाहेर घेऊन जाऊ शकत नव्हतो. शिवाय त्यांच्या अंगात मागील ४ दिवसांपासून मळलेला एकच कुर्ता-पायजमा असल्यामुळे मला त्यांच्यासोबत फिरण्याची लाज वाटत होती. काय अवतार साहेबांचा... त्या भागवत कडून आणलेला गुलाबी पायजमा आणि त्यावर पांढऱ्या रंगाचा मळलेला कुर्ता, पण त्याचे ह्यांना काहीही पडलेले नाही . काय तर म्हणे, " लकी गुलाबी पायजमा ! "... लहानपणी आमच्या गल्लीत आराध्यांच्या मेळयात संबळ वाजविणारा एक गोंधळी यायचा त्याचे कपडे आणि आजचे साहेबांचे कपडे यात किंचीतही फरक वाटत नव्हता.

काहीही करून आपण इथून सटकायचे आणि २ तासांनी परत यायचे असे मी ठरविले. सर... , माझे एक महत्वाचे काम इथे जवळच आहे... जास्त वेळ नाही लागणार... मी जरा जाऊन

येतो, असे म्हणतोय इतक्यात साहेबांचा फोन वाजला, आज साहेबांच्या घरी कुणीही नव्हते आणि कुणीतरी त्यांना भेटायला आले होते, त्यामुळे सोसायटीच्या सिक्युरिटी ने फोन केला होता.

मागील ३-४ दिवस वाट पाहूनही आपल्या कस्टमर ची पायजमा परत दिली नाही म्हणून भागवत खोबने नावाचा इसम चिडून गोरे साहेबांच्या घरी त्यांना शोधत आला होता . सरांनी त्याला हॅलो.. कोण आहे, नमस्कार-चमत्कार करण्याचा प्रयत्न केला... परंतु भागवत त्याच्या कोळश्याच्या इस्त्री मधल्या फुललेल्या विस्तवासारखा भडकला होता. तो तोंडात येईल त्या शिव्या देत होता, ज्या शिव्यांचे अर्थ काय होतात हे सुद्धा साहेबांना उमगत नव्हते. त्यामुळे नेहमीप्रमाणे त्यांनी माझ्याकडे फोन दिला आणि सिचुएशन हॅन्डल करण्याची विनंती केली. मी पण सुरुवातीला त्याचे बोलणे ऐकून घेतले कारण चूक आपल्याच माणसाची होती. मी त्याच्या शिव्या देण्याच्या फ्लोला तोडून, " मी गोरे साहेब नसून त्यांचा असिस्टन्ट आहे ह्याची जाणीव करून दिली ". तो माझे काहीच ऐकून घेण्याच्या

मनःस्थितीत नव्हता.. " सायबांनाच फोन द्या " म्हणू लागला. साहेब घाबरून फोन घ्यायला तयार नव्हते.

एकतर समोरून तो अडाणी भागवत शिव्यांची लाखोली वाहत होता आणि साहेब मला इशारे करून तो काय म्हणतोय हे विचारत होते. माझा एक वयक्तिक प्रॉब्लेम आहे, मला इशाऱ्याची भाषा अजिबात समजत नाही. तरीही मी इशाऱ्यांच्या आधारे साहेबांसोबत सवांद साधण्याचा थोडा वेळ प्रयत्न केला, परंतु खरंच मला साहेबांचा एकही इशारा समजला नाही. भागवत जास्तच तापू लागला होता त्यामुळे मी साहेबांच्या आणि माझ्या सर्व इशाऱ्यांचा एक निष्कर्ष काढला आणि शेवटी भागवतला शांत करण्यात यशस्वी झालो. मी त्याला सरळ सांगितले की, साहेबांचा जवळचा एक मित्र वारला आहे त्यामुळे आम्ही अंतयात्रेत आहोत शिवाय साहेबांनी मित्राच्या मड्याला खांदा दिलाय त्यामुळे ते तुझा फोन घेत नाहीयेत.

कुणीतरी गचकलंय हे ऐकल्यावर कसातरी तो थंड झाला आणि त्याच्या वेदना सांगू लागला, " लय मोठा प्रॉब्लेम झालाय सायब... काय सांगू तुमाला?... माझ हॉस्टल मंदी एक

छोटस इस्त्री करायचं दुकान हाय? ", मागल्या सोमवारी तुमच सायब इकड कसलंतरी भाषण ठोकायला आलं हुत... भाषण सुरु व्हायच्या अगुदर सायबाला मुतायच हुत पण तेंच्या पायजमाची नाडी झालती टाईट... त्यामुळ नाडी सुटीच ना राव... ! जाम पंचायत झालती अन तिकडं भाषणाची येळ झाली म्हणून स्टेजवर नाव पण पुकारत हुती... येळच अशी आली हुती की, सायबाची कापावी लागली नाडी... आता बिगर नाडी ची पायजमा कशी घालायची?... त्यामुळ... म्या दया दावली अन दुकानातला एक पायजमा उधार दिला सायबाला... वाटल हुत आणून देत्याल काम झाल्यावर... ती पायजमा एका खडूस रेक्टर ची हाय... त्यानं माझ्याकड इस्त्री मारायला दिला हुता... ..मागचं ३ दिस रोज, "आज देतु -उद्या देतु " अशी टोलवा-टोलवी करून झाली पण आज शेवटी वैतागून त्या पायजमाच्या मालकाने माझ्या कानाखाली जाळ काढला. ह्या तुमच्या गोरे सायबाचा पत्ता मिळविण्यासाठी मला किती जणांच्या हाता -पाया पडावं लागलं ते माझ्या जीवाला माहित.

त्याला मी सांगितलं की, तू परत हॉस्टेलमध्ये जाऊन दुकान उघड... आम्ही थोड्याच वेळात तुझा पायजमा घेऊन तिकडे येतो. तर तो म्हणाला, " त्या रेक्टर न मला विना पायजमा हॉस्टेल मंदी पाय ठिवायचा न्हाय असा दम दिलाय त्यामुळ आज रात जरी झाली तरि म्या परत जाणार न्हाय . तुमच्या सायबांना सांगा, " आज हा भागवत पायजमा परत घेतल्याखेरीज माघारी जाणार न्हाय ", असे म्हणून त्याने कॉल कट केला.

आता अक्ख्या सोसायटी समोर तमाशा होईल याची साहेबांना चिंता वाटू लागली होती. मी त्यांना धीर देत " सर भाषणाची वेळ जवळ आली आहे " त्यामुळे तुम्ही आत्ता फक्त भाषणाकडे लक्ष दया अशी विंनती केली.

अरे, पण माझी बायको आल्यावर तिच्यासमोर हा भागवत राडा करेल... आता तिला किंवा त्याला समजून सांगावं लागेल. मी म्हणालो, " ओके तुम्ही ते माझ्यावर सोडा त्या दोघांना हॅन्डल करायचं काम माझं . अजून काही जास्त वाढण्याआधी आपण घरी पोहचणे योग्य ठरेल त्यामुळे तुमचे भाषण लवकर संपवा.

मी अगोदर सरांच्या बायकोला फोन केला, त्यांना अजून हॅलो म्हणतोय तर तिकडून त्यांचा कडवट रिप्लाय, "लष्कराच्या भाकरी भाजून झाल्या असतील तर घरातील स्वछता ही सुद्धा ह्या तुमच्या " जागतिक स्वछता वीक "मध्ये सामील करायला काहीही हरकत नाही असे तुमच्या साहेबाना सांगा जरा ".

मी आपला, " हो सांगतो तसे साहेबांना" असे म्हणालो. मी फोन का केलाय हे सांगायचा फक्त प्रयत्नच करत होतो पण ह्या मॅम काही ऐकून घेण्याच्या मूडमध्ये नव्हत्या. पुढे त्या म्हणे, "स्वतः मळकट-कळकट-अस्वछ कपडे घालून जगाला स्वछते बद्दल शहाणपणाचे व्याख्यान देणे कितपत योग्य आहे?".

हो मॅम, मी त्यांना इथून पुढे नीटनेटके कपडे घालायला सांगेन... तुम्ही जरा शांत व्हा.

साहेबांना जरा सांगा, घरातील कचरा साफ करण्यासाठी, ' थोडा वेळ द्यावा सजेशन देऊ नये ' म्हणजे मग जगातील कचरा आपोआप स्वच्छ होईल .

बर मॅम मी त्यांना सांगेन सर्व समजून... आता मी तुम्हाला का फोन केला हे ऐकता का जरा? प्लिज . त्यावर त्या म्हणे,

"म्हणजे पहा एक हाताखाली काम करणारा माणूस ह्यांना समजून सांगणार, धन्य आहे रे परमेश्वरा !" अहो गोरे मॅम मला तुम्हाला एक महत्वाचं बोलायचं होत बोलू का? तरीही ती बाई माझे एकही वाक्य पूर्ण न ऐकता, साहेबांच्या सोबत संसार करताना तिला किती त्रास होतोय ह्याचा पाढा वाचण्यात दंग होती. शेवटी साहेबांनी माझ्या हातातून फोन हिसकावून घेतला आणि तिला म्हणाले, "अग ये दगड, हो मी तुझा नवरा म्हणजे खूप मोठा गाढव आहे, त्याबद्दल ह्यांना नंतर निवांत बोल... आत्ता फक्त ते काय सांगत आहेत ते ऐकून घे जरा !".

मला वाटलं नवऱ्याने सांगितल्यावर तरी बायकोचा तक्रारी सांगण्याचा वेग कमी होईल तर झाले उलटेच त्या अजून जास्त भडकल्या. सांगू लागल्या की, " मी सहज विनंती केली की, थोडाफार घरातील स्वच्छेते साठी हातभार लावा तर त्यांनी मला मदत करण्या ऐवजी काल रात्री ९ ते ११ ह्या वेळेत स्लाईड्स लावून "13 Secrets of People Who Always Have a Clean House! By-Kelly Bryant" ह्यावर चक्क २ तास सजेशन कम लेक्चर दिले ". आता आमच्या साहेबांच्या कामचुकारपणा बद्दल मागील ५ वर्षांपासून प्रॅक्टिकल

एक्सपिरियन्स असल्यामुळे मॅम च्या भावना मी समजू शकत होतो .

साहेबांच्या फालतूचे कांड करण्याच्या सवयी मुळे नेहमी मला बोलणी खावी लागतात याचे त्यांना आजवर काहीही अप्रूप वाटले नाही... कारण ते ह्याला माझ्या ड्यूटी चाच भाग समजतात . आता मात्र ह्या माणसाची हद्द झाली, मी फोन वर बोलतोय म्हणून ते मला इशाऱ्याने भूक लागलीय असे सांगत होते. काय करावं ह्या माणसाला आपल्यामुळे समोरचा माणूस विनाकारण अभद्र गोष्टी ऐकतोय ह्याबददल काहीही देणे-घेणे नाही ह्या माणसाला, मी फोनवर बोलतोय (खरे तर फक्त ऐकतोय ) हे पाहून देखील नाष्टा करायला म्हणून मला कॅन्टीन कडे ओढत होते . नशीब माझे !... अखेर १० मिनिट सरांबद्दल मन भरून शिव्या देऊन झाल्यानंतर मॅम स्वतः म्हणाल्या बोला आता तुम्ही कशासाठी फोन केलेला? माझी बोलण्याची वेळ आली परंतु आता काय बोलावं सुचत नव्हतं. परिस्थिती कंट्रोलमध्ये आणण्यासाठी साहेबांबद्दल काहीतरी चांगलं बोलणं आवश्यक होत म्हणून मी त्यांना सांगितलं की,

तुमच्यासाठी एक खुश खबर आहे . तुमच्या घरी एक भागवत खोबने नावाचा व्यक्ती आला आहे .

आता हा कोण, भागवत खोबने? आणि कशाला आला आहे? मी माझ्या भावाच्या घरी आली आहे पाषाण ला. भागवत आला असेल भगवंत नाही ना त्यात कसली खुश खबर?

अहो मॅम, ते नाही का पहिल्या दिवशी साहेबानी खूप छान भाषण केले होते त्या विद्यापीठातील हा भागवत " सरकारी धोबी " आहे . आयोजकांनी सरांच्या भाषणावर प्रेरित होऊन भागवतला तुमच्या घरी फुकट कपड्याना इस्त्री करून देण्यासाठी पाठविले आहे. फक्त एक करा की, त्याच्यासमोर तुम्ही सरांबद्दल जास्त बोलू नका त्याला कुणी नवऱ्याबद्दल पाठी-मागे बोललेले आवडत नाही. त्याला तुम्ही नाष्टा -पाणी करा तोपर्यंत आम्ही तिकडे येतो. थँक गॉड... आपल्या घरी कुणीतरी मदतीला येतेय हे ऐकताच जास्त आढे -वेढे न घेता... थोड्याच वेळात घरी जाते असे म्हणून मॅम ने फोन कट केला.

मला वाटलं आपण तोंडाला येईल ते सांगतोय म्हणून साहेब रागाला जातील पण मी जे काही बायकोला सांगितलं

त्याबद्दल कसलाही अक्षेप न घेता... अगोदर नाष्ट्याची ऑर्डर दे मला खूप भूक लागलीय असा आदेश सरांनी मला दिला . शुगर असल्यामुळे हा माणूस भरपेट नाष्टा करेल म्हणून मी डबल इडली -वडा सांबर ची ऑर्डर दिली.

आता भागवतला फोन करून सरांची बायको येतेय, तिच्यासमोर पायजमा मागू नको ह्याबद्दल बोलणं अत्यंत गरजेचे होते. म्हणून मी साहेबांच्या मोबाईल वरून परत त्या सोसायटीच्या सिक्युरिटीला फोन लावून भागवतला बोलण्यास सुरुवात केली. आता फोन तर केला होता पण बोलणार काय ह्याबद्दल माझ्या डोक्यात काहीही आयडिया नव्हती. शिवाय सरांनी मित्राच्या मड्याला खांदा दिल्यामुळे ते फोन अजिबात उचलत नव्हते. काय करणार... त्यामुळे आता हे प्रकरण मलाच हॅन्डल करावे लागणार होते.

मी भागवत शी बोलायला सुरु केले, "भागवत सरांची बायको घरी येत आहे ..तिला माहिती नाहीये की सर मित्राच्या अंत्ययात्रेला आले आहेत ".

त्यावर तो येडा म्हणाला, " बर मंग म्या सांगतु त्यांच्या बायकुला की, तुमच्या नवऱ्याचा मित्र वारलाय अन सायबांनी

त्याला खांदा दिलाय ". मेलेल्या माणसाला खांदा देण लय पुण्याई च काम हाय बघा !

अरे बाबा मी काय सांगतोय ते नीट ऐकून घे, " सरांची बायको खूप इमोशनल आहे म्हणून तिला आम्ही सांगितलं नाहीये . तू सुद्धा काही सांगू नको नाहीतर पुढील ३ महिने त्या रडत बसतील ".

काय सांगताय काय राव तुमी?, नवऱ्याच्या मित्राची मयत झाल्यामुळ ३ महिन रडते ही बाई? बर म्या त्यांना मयता बद्दल काहीच सांगत न्हाय . म्या पायजमा घेतु अन चालता हुतु मला त्या रेक्टर चा पायजमा वापीस देवून माझ दुकान उघडायच हाय !.

अरे, " तू पायजमा बद्दल तर अजिबात काही बोलू नको आम्ही आल्यावर तुला तुझी पायजमा देतो आणि वाटल्यास तुला तुझ्या हॉस्टेल पर्यंत कारमध्ये सोडायला येतो " . तू फक्त शांतपणे सरांच्या घरी टीव्ही बघत बस. अक्षरश: मला " सरांच्या बायकोला काहीही बोलू नको ", ह्या वाक्याशिवाय दुसरे काहीही सुचायचे बंद झाले होते... Blank Total Blank...

आव माझा येळ कशाला वाया घालवताय?

म्या माझी पायजमा घेऊन निघतू राव अगुदरच सकाळपासन माझं दुकान बंद हाय. माझा पण एक लहानपणापासन प्रॉब्लम हाय म्हंजी... त्याच आस हाय की, " मी जर एखाद दिशी कापडावर इस्त्री न्हाय मारली तर माझ हात थरथर कापत्यात हो... ! ".

काय तुझे हात थरथर कापतात?... देवा जगातील सर्व गंजडे लोक माझ्याच नशिबात का येतात?

म्या तुमाला समजून घितुया... जरा तुमी पण गरिबाला संभाळून घ्या सायब... " माझ हात थरथर कापायला सुरुवात झालीय ओ !".

आता मी फोन वर सरांनी वाढवून ठेवलेली प्रकरणे सोडवीत होतो इतक्यात आमचे साहेब शेजारच्या गाड्यावर जाऊन छोले-भटुरे ची ऑर्डर देऊन पण आले. नेहमीप्रमाणेच ह्या माणसाला स्वतःच्या चुकीमुळे सुरु झालेल्या प्रकरणाचा कसलाही सीरिअसनेस अजिबातच नव्हता... एकदम कुल माणूस... निवांत प्राणी... !

आता ह्या गंजेडी भागवत चा हात थरथर कापू नये म्हणून त्याला काय उपाय सांगावा हे माझ्या बुद्धिमत्तेच्या बाहेरच काम होत . तरीही त्याला काहीतरी सांगावं लागणारच होत म्हणून सरळ त्याला सांगून टाकले की, " तू सरांच्या बायकोला असे सांग की... तूला सरांच्या भाषणावर प्रेरित होऊन विद्यापीठातील लोकांनी कपडे इस्त्री करण्यासाठी पाठविले आहे. म्हणजे तुला थोडेफार कपडे इस्त्री करायला मिळतील आणि त्यामुळे तुझे हाथ थरथर करणार नाहीत ".

तो पण खुश झाला आणि म्हणाला, " व्हय सायब तुमी म्हणाल तस ..मला काय कुठतरी काम करायचच हाय... पण त्या देतील ना मला कापड इस्त्री मारायला? "

हो बाबा देतील... आम्ही सांगतो मॅम ला... तू फक्त त्यांना " मयत आणि पायजमा " ह्या दोन गोष्टींबद्दल अजिबात काहीही सांगू नकोस. तुला तुझा पायजमा आणि सरांच्या घरी इस्त्री करशील त्या कपड्यांचे पैसे आम्ही आल्यावर देईन... त्यामुळे तू इस्त्री करण्याच्या पैस्याचा सुद्धा विषय काढू नकोस... जर विचारले तर सांग फुकट इस्त्री करू देण्यास तुला आयोजकांनी पाठविले आहे.

इतक्यात आमच्या टेबलवर वेटर इडली-वडा सांबर आणि पलीकडच्या गाड्यावरील छोले-भटुरे ठेवून गेला आणि आमच्या " निर्लज्जम सदासुखी " माणसाने खायला सुरुवात देखील केली.

साला आज चा दिवसच फालतू होता एक झाला की दुसरा प्रॉब्लेम समोर येत होता... आणि हे प्रॉब्लेम ज्यांच्या मालकीचे आहेत ते मात्र... ' मस्त ..निवांत ' . आता भागवत म्हणे की, " चालल म्या पैश्याचा ईषय काढणार न्हाय... ! पण शेवटची एक अडचण हाय !... , म्हंजी मला फक्त कोळश्याच्या इस्त्री ची सवय हाय त्यामुळं लाईटवरची इस्त्री वापरता येणार न्हाय . जरा कोळशाची इस्त्री असल तर बघता का?... मिळाली तर... बर हुईल... !

आता मात्र माझी क्षमाशीलता कायमची नष्ट होईल आणि मी एखादा मर्डर करेल असे मला वाटत होते..! मी वैतागून भागवतला म्हणणार होतो की, तुझ्या तर xxx पण... नाही म्हणालो, स्वतःला कंट्रोल केलं. त्याला फक्त सांगितलं की, " राजे थोडा ट्राय करा "... " जमेल तुम्हाला लाईटवरची इस्त्री

वापरायला "... " प्लिज... ! तुम्हाला आता कोपरापासून हाथ जोडतो "... असे बोलून मी फोन बंद केला.

आता बोलून बोलून (बऱ्यापैकी खोटे ) माझ्या तोंडातील लाळ संपली होती आणि भूक वाढली होती. काहीतरी खाऊन घेऊ म्हणून मी टेबलाकडे पाहिले तर समोर असा नजारा... जसे की एखादा लहान मुलगा साबणाच्या फेसमधून होणाऱ्या बुडबुड्यांचा फुगा बोट लावून फोडण्याचा आनंद लुटतो तसेच हे आमचे ४७ वर्षाचे बाळ समोर असणाऱ्या गरम-गरम छोले-भटुरे च्या प्लेट मधील फुगलेल्या पुरीला बोट लावून फोडण्याचा आनंद लुटण्याचा प्रयत्न करत आहे. मी अजून एकच घास तोंडात टाकतोय इतक्यात गरम पुरीमध्ये बोट घालताना वाफ पोळल्यामुळे स्वतःशी च झालेल्या झटापटीत समोरील प्लेट मधील सर्व गरम रस्सा शिवाय शेजारच्या प्लेट मधील गरम सांबर साहेबांनी अंगावर पाडून घेतले. नुसतेच तेव्हडे करून भागले नाहीत तर त्या प्लास्टिक च्या खुर्ची सहित खाली पडले त्यामुळे ती बिचारी खुर्ची सुद्धा मोडून पडली. आवाज इतका मोठा झाला की, सर्व लोक काय झाले म्हणून पाहू लागले... आजूबाजूच्या दुकानातील लोकही खाली

पडलेल्या साहेबांचे दर्शन घेण्यासाठी जमा झाले. आता त्या कॅन्टीन चा मालक केरळचा अण्णा त्याच्याशी बोलायला माझ्याकडे शब्द उरले नव्हते... मी फक्त एक तुकडा इडली खाल्ली होती... परंतु झालेल्या घटनेमुळे, डबल इडली-वडा सांबर, छोले -भटुरे आणि तुटलेल्या खुर्चीची किंमत टोटल गोळाबेरीज बील म्हणून दिले. कुणी ओळखीच्या लोकांनी पाहिले तर नाही याचा अंदाज घेत तेलकट भाजीत भिजलेल्या साहेबांना सोबत घेऊन निसटलो. पण ह्या माणसाला झालेल्या तमाशा बद्दल काहीच वाटत नव्हते फक्त त्यांना वाईट ह्याचे वाटत होते की, त्या अंगावर सांडलेल्या भाजीमुळे त्यांची गुलाबी रंगाची पायजमा आता तेलकट लाल रंगाची झालीय. ह्या छोले-भटुरे च्या प्लेटमध्ये उंगली केल्यामुळे साहेबांना आजचे व्याख्यान कॅन्सल करावे लागले शिवाय घराकडे जावं तर भागवत ची भीती त्यामुळे नाईलाजाने मी त्यांना माझ्या घरी घेऊन गेलो.

# आयर्न मॅन आणि सेल्फी विथ भागवत!



हि एक विनोदी सेरीज असून मागील ३ भागात गोरे साहेब म्हणजे माझे बॉस हे पात्र कसे नेहमी " हात दाखवून अवलक्षण ओढवून घेते " हे आपण पाहिले. आपला आयुष्य नावाचा जीवनपट ज्याने लिहून ठेवला आहे त्याने आपल्या जीवनामध्ये येणारे प्रत्येक पात्र केंव्हा, कसे आणि कुठून येईल या बद्दल चे

सर्व अधिकार स्वतः कडे राखीव ठेवलेले असतात. त्यामध्ये फेरफार करण्याचा आपल्याला अजिबात अधिकार नसतो... त्यामुळे योग्य वेळ झाली की, त्या पात्राची एन्ट्री आपल्या आयुष्यात नक्की होतेच. मी नोकरी निमित्त पुण्यात आलो आणि गोरे साहेब नावाचं पात्र माझ्या आयुष्यात आले.. कारण माझ्या जीवनपटाचे काही एपिसोड त्यांच्या सोबत लिहिले असावेत. परंतु ह्या माणसामुळे विनाकारण बाकीची पात्रे नेहमी येतच राहिली... त्यापैकी एक पात्र म्हणजे ' भागवत खोबने '. ह्या भागवत नावाच्या माणसाला भेटण्याआधी माझ्या मनात त्याच्या बद्दलची जी इमेज होती त्यापेक्षा तो खूप वेगळा होता. मी थोडक्यात ह्या भागवत चा परिचय करून देतो, मागच्या सोमवारी पुण्यातील एका विद्यापीठाच्या हॉस्टेलमध्ये गोरे साहेबांचं व्याख्यान होते . नेमके व्याख्यान सुरु होण्याच्या १० मिनिट अगोदर गोरे साहेब वॉशरूमला गेले असता त्यांच्या पायजम्याची नाडी सुटण्याऐवजी खूप घट्ट बांधली गेली... त्यामुळे त्यांच्याकडे नाडी कापण्याशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. हॉस्टेलमध्ये भागवतचे इस्त्री करण्याचे दुकान असून त्यावेळी तो निवांत दुकानात झोपलेला होता, त्यामुळे गोरे साहेबांनी त्याच्या मदतीने नाडी कापली. शिवाय व्याख्यान सुरु

होण्यास २-३ मिनिट बाकी आहेत अशी अनाऊंन्समेंट ऐकल्यावर त्याच्याकडून एका कस्टमरचा इस्त्री करण्यासाठी आलेला पायजमा साहेबांनी मागून घेतला. भागवत चा असा समज होता की, साहेब १-२ दिवसात पायजमा परत आणून जमा करतील. परंतु ३-४ दिवस झाले तरी असे काही झाले नाही. त्या पायजमा च्या मालकाने २-३ दिवस कारणे ऐकून घेतली परंतु चौथ्या दिवशी त्याने भागवतच्या कानशिलात लगावली. त्यामुळे चिडलेला भागवत साहेबांना शोधत त्यांच्या घरी पोहचला.

साहेबांच्या, " बायकोला ह्या पायजमाबद्दल काहीही माहिती नव्हते आणि तिला माहिती होऊ नये ", ही काळाची गरज होती, कारण साहेबांची बायको आज सकाळीच भांडण करून पाषाणला असणाऱ्या तिच्या भावाकडे रागाने निघून गेली होती. आता आपण घरी नसताना चिडलेला भागवत घरी आलेला आहे... त्यामुळे त्याचा राग शांत करण्यासाठी घरी कुणीतरी असणे गरजेचे होते... नाहीतर... हा अडाणी भागवत सोसायटीमध्ये बवाल करेल अशी साहेबांना भीती वाटत होती. साहेबांची, " आ बैल मुझे मार " ही परंपराच आहे. शिवाय

आलेल्या बैलासमोर नेमका माझाच बळी द्यायचा अशी खोड असल्यामुळे... हे प्रकरण सुद्धा मलाच हँडल करावं लागणार होत. त्यामुळे मी साहेबांच्या बायकोला फोन करून असे सांगितले की, तुमच्या घरी कपडे प्रेस करण्यासाठी विद्यापीठाने पाठविलेला भागवत नावाचा व्यक्ती आला आहे तर तुम्ही त्याच्याकडून फुकटात कपडे इस्त्री करून घेण्यासाठी जावे. शिवाय, " आपण फक्त कपडे प्रेस करून देण्यासाठी आलो आहोत ", इतकेच बोलायचे... अजिबात " पायजमा " चा विषय काढायचा नाही अशी अट घालून भागवतला सुद्धा सेट केले.

आज आपण व्याख्यान संपवूनच घरी जायचे .. असे मी आणि गोरे साहेबांनी ठरविले होते... " जो होगा देखा जाएगा ! "... परंतु कार्यक्रम सुरु होण्यास वेळ असल्यामुळे नाश्ता करून घेऊ म्हणून हॉटेलमध्ये गेलो असताना... साहेबांनी छोले-भटुरे मधील गरम पुरीमध्ये उंगली करून समोरच्या प्लेट्मधील तेलकट आणि गरम सांबर अंगावर पाडून घेत स्वतः ही खाली पडण्याचा पराक्रम केला. अंगावर भाजी सांडल्यामुळे

साहेबांची झालेली विचित्र अवस्था पाहून... व्याख्यान कॅन्सल करून मी त्यांना माझ्या घरी कपडे बदलण्यासाठी घेऊन आलो. घरी आल्यावर साहेबांनी कपडे वॉशिंग मशीनमध्ये टाकले आणि मोबाईल माझ्याकडे देऊन थोडावेळ आराम करण्यासाठी बेडवर आडवे झाले. साहेबांचा घोरण्याचा आवाज आणि माझ्या हातामध्ये असणाऱ्या त्यांच्या मोबाईलच्या रिंगटोन चा आवाज एकदमच सुरु झाला. साहेबांच्या घरून फोन होता त्यामुळे कट न करता रिसिव्ह केला तर, त्यांची बायको... " अहो तुम्ही दिलेल्या भाषणावर फिदा होऊन त्या आयोजकांनी पाठविलेला भागवत नावाचा धोबी खूप कामाचा आहे... sss आल्यापासून घरातील कपडे इस्त्री करण्याचा त्याने सपाटा लावलाय ". तुम्ही "सेल्फी विथ भागवत ! " ही मी टाकलेली पोस्ट आणि फोटो पाहिला का? आपल्या सोसायटीच्या व्हाट्स अप ग्रुप वर? शिवाय माझे व्हाट्स अप चे स्टेट्स पण बघा "सेल्फी विथ भागवत ! ".

मी शेवटी त्यांचं बोलणं मध्येच तोडून, " अहो म्याडम समोरून कोण बोलतंय हे तरी चेक करत जा... साहेब कामात आहेत आणि त्यामुळे फोन माझ्याकडे दिलाय.

जरा त्या भागवत कडे फोन देता का? त्याच्याशी जरा मला महत्वाचं बोलायच आहे. तेंव्हा भागवत ने फोन घेतला, "बोला सायब, झाले का समदे विदी? "

अरे ये ' बावळट ' त्या म्याडम समोर कशाला विचारतोय विधी? आपलं काय ठरलंय?

चुकलं सायब... बरं मंग इकडं कंदी येणार हायसा तुमी दोघ?

आम्ही येईन थोड्या वेळात... तू मला सांग तिथली सर्व परिस्थिती ठीक आहे ना? तू म्याडम समोर ' पायजमा ' चा विषय नाही ना काढला?

हा इकडं सगळं झ्याक हाय... अन म्या म्याडम समोर ' पायजमा ' चा इषय न्हाय काढला.

अरे बोकडा sss " ती बाई बाजूला उभी आहे ना तुझ्या? " अरे ..तिच्यासमोर काय बोलतोय तुला कळतंय का? आता ' पायजमा ' बद्दल कशाला तोंड वर करून बोल्लास? तुला फक्त ' हो ' किंवा ' नाही ' असे बोलता येत नाही का?

चुकलं सायब... म्या अडाणी माणूस हाय... आता इथनं पुढं म्या म्याडम समोर ' पायजमा ' चा इषय काढणार न्हाय... ! बर तुमी कधी येणार हाय?

अरे येतोय म्हणून सांगितलं ना तुला एकदाच... काय गडबड लावलीय?

आव सायब... मला काय बी फरक पडायचा न्हाय उलट माझा धंदा झोरात सुरु हाय इथं..तुमी या निवांत !!

काय sss धंदा जोरात सुरु आहे? म्हणजे?

सायब, " म्या ह्या घरात आल्यापासन ह्या बाई... म्या फुकट कापड इस्त्री मारणार हाय म्हणून... घरातली समदी कापड आणून टाकत हायत माझ्या समोर,... अन म्या काय मारतुया सम्ध्या कापडांना इस्त्री ". जवळजवळ ५ 0 -६ 0 कापड इस्त्री मारली मागच्या २ तासात.

मी फोन मुद्दाम... काय-sss काय sss करत कट केला. कारण मला सरांच्या घरी काहीतरी गडबड वाटू लागली होती.

घरात तिकडे " धोबीपछाड " सुरु करून... हा माणूस मात्र निवांत लहान बाळाप्रमाणे झोपला होता... काय करावं मला

काहीच सुचत नव्हतं. काहीही करून भागवतला आता कपडे इस्त्री करण्यापासून रोखायचे होते. नाहीतर, त्याने इस्त्री केलेल्या कपड्यांचे पैसे मला द्यावे लागतील. साला sss वाटल होत २-४ कपडे इस्त्री करून बसेल गप... पण हा तर येडा गांजा खाऊन आल्यासारखा शोधून-शोधून कापडांना इस्त्री मारतोय.

मी साहेबांना झोपेतून उठवून त्यांच्या घरी सुरु झालेल्या नवीन प्रकरणाबद्दल कल्पना दिली आणि त्यांच्या बायकोने सोसायटीच्या ग्रुप वर केलेली पोस्ट पाहायला सांगितली.

चक्क सरांच्या बायकोने, "सेल्फी विथ भागवत ! ". नावाची भली मोठी पोस्ट टाकली होती आणि त्यात असे नमूद केले होते की, " गोरे साहेबांच्या भाषणावर प्रेरित होऊन आयोजकांनी फुकट कपडे इस्त्री करून देण्यासाठी एक सरकारी सेवक आमच्या घरी पाठवून दिला आहे. त्यामुळे सोसायटीतील प्रत्येकांनी किमान ५ जोडे कपडे फुकट इस्त्री करून नेण्याचा लाभ घ्यावा... धन्यवाद... ! ".

अरे बाप रे? म्हणजे म्याडम ने आज भागवतकडून घरातीलच नाही तर अक्ख्या सोसायटीतील सर्व कपडे इस्त्री करून घेण्याचा मानस केलाय?... कठीण आहे रे देवा... !

क्षणभर वाटले, " ह्या बाईच्या मेंदूवर का कुणी फिरवत नाही जरा इस्त्री ..! ".

साहेब सुद्धा मेसेज वाचल्यापासून घामाघूम झाले त्यांनाही काही सुचेना ते म्हणाले की, " माझ्या बायकोच्या मोबाईल वर फोन करून माझ्या मुलाकडे फोन द्यायला सांग... त्याला नक्की काय परिस्थिती आहे याबद्दल आपण विचारू ". मला माझी अर्धा तासाची झोप इतकी महागात पडेल असे वाटले नव्हते !!!

मला सरांचे म्हणणे पटले कारण त्यांचा पोरगा इंग्लिश मिडीयम चा आणि बायको सातवी पास ह्यामध्ये बराच फरक आहे... त्यामुळे सरांनी सांगितल्या प्रमाणे मी फोन केला आणि त्यांच्या पोराने उचलला. मी त्याला सुरुवातीपासून काय -काय झाले ह्याबद्दल विचारले तर तो म्हणे, " सकाळी मम्मी आणि बाबांचे भांडण झाले त्यामुळे आम्ही मामाकडे पाषाणला गेलो".

अरे बाबाsss " सुरुवातीपासून म्हणजे सकाळी झोपेतून उठल्यापासून नाही रे राजा... हा भागवत भेटल्यापासून काय घडले ते सांग ".

ओह्ह बर बर सांगतो... " तुमचा फोन आल्यावर अचानक मम्मी मला घरी जायचं असे म्हणू लागली... मी विचारलं का काय झालंय? तर तिला ऐनवेळी " धोबी " हा शब्द काही आठवेना त्यामुळे तिने मला आपल्या घरी " आयर्न मॅन " आलाय असे सांगितले ".

काय " आयर्न मॅन " आलाय? काहीतरीच काय हे?

हो ना माझा सुद्धा मूड ऑफ झाला मी, " आयर्न मॅन " आलाय म्हणून लगेच आवरून निघालो मम्मी सोबत आणि इथे आल्यावर पाहतोय तर काय? ? हा तर " चिम्पान्झी " सारखा दिसणारा विचित्र भागवत नावाचा प्राणी निघाला.

धन्य आहे रे तुझी मम्मी आणि बाबा !!!.

हो ना मला सुद्धा आजच माहिती झालं, मम्मीचा " आयर्न मॅन " म्हणजे कपड्यानां "आयर्निंग करणारा मॅन ".

बर.. " एक मिनिट तुझ्या बाबानं सोबत बोल "... म्हणून मी फोन सरांकडे दिला.

बेटाsss " सोसायटीच्या ग्रुप वरचा मेसेज मम्मा च्या फोन मधून डिलीट कर... नाहीतर भागवतला विनाकारण अक्ख्या सोसायटीचे कपडे प्रेस करून द्यावे लागतील ".

बाबा... आता खूप उशीर झाला... .आता मेसेज डिलीट करून काहीही उपयोग नाही... !

म्हणजे? का बरे मेसेज डिलीट करून काहीही उपयोग नाही?

तुम्ही काय इतका वेळ झोपला होतात का बाबा?

हो झोपलो होतो... सॉरी... sss... सॉरी... नाही म्हणजे एका इंपॉर्टन्ट मिटिंगमध्ये होतो... पण मला सांग तुझ्या मम्मी ने टाकलेला मेसेज किती लोकांनी सिरिअसली घेतलाय?

बाबा जवळ जवळ ९० % लोकांनी... आपल्या सोसायटीमध्ये टोटल ७० फॅमिलीज राहतात... त्यातील ४० फॅमिली प्रत्येकी ५ ड्रेस फुकट प्रेस करण्यासाठी म्हणून आपल्या घरी ठेवून... " सेल्फी विथ भागवत ! ". ..घेऊन... चहा-पाणी पिऊन.. गेले सुद्धा परत !

अरे नालायका sss यमक कसली जुळवितोय? तुझ्या मम्मीला हे सर्व करण्यापासून रोखायचं नव्हतं का?

बाबा ती तुम्हाला ऐकत नाही sss आणि तुम्ही माझ्यासारख्या १० वर्षाच्या चिमुकल्याकडून कसली अपेक्षा ठेवताय? एक फ्रीमध्ये Advice देतो ती घ्या... !

बोल काय आहे तुझी Advice?

हे पहा बाबा, ७० पैकी ४० फॅमिलीज घरी होत्या आणि बाकीच्या ३० फॅमिली ऑफिसमध्ये असल्यामुळे येऊ शकल्या नाहीत.. परंतु ते लोक नक्की ह्या संधीचा लाभ घेण्यासाठी येणारच. त्यामुळे तुम्ही येऊन ही फुकट इस्त्री करून घेण्याची संधी ठराविक कालावधी पर्यंतच मर्यादित होती... असे सांगून ३0 x ५= १५0 कपडे फुकट प्रेस करून देण्यापासून वाचवू शकता... बघा म्हणजे विचार करा..!

हो, तू म्हणतोय ते बरोबर आहे... पण तरीही तू आता मम्मी ने पसरविलेल्या, " फुकट इस्त्री करून मिळेल" ह्या मेसेजला अफवा होती असे सिद्ध करण्यासाठी जरा पाऊले उचल... नाहीतर आपणाला खूप महागात पडेल ही "सेल्फी विथ भागवत ! ".

अहो बाबा काय सांगू तुम्हाला मम्मी चा पराक्रम... ?

तिने घरातील एकही कपडा सोडला नाहीये... घरातील पडदे म्हणू नका, सोफयाचे -उश्याचे कव्हर म्हणू नका, अहो किचनमध्ये पुसायला असते ते फडके, तुमचे जुने फाटलेले सॉक्स, आणि हो देव घरातील सर्व देवांचे अंगावरील कपडे सुद्धा... म्हणजे देवालाही सोडले नाही... फुकट आहे म्हणून भागवत कडून सर्व प्रकारची कापडे इस्त्री करून घेण्याचं काम अविरत पणे सुरुच आहे. लवकर घरी या नाहीतर फुकट आहे म्हणून माझ्या अंगावर सुद्धा इस्त्री फिरवायला मागेपुढे पाहणार नाही मम्मी.

तुझी मम्मी " मंद " आहे हे माहिती होते मला sss पण आज ती " मतिमंद " झालीय हे नक्की sss अरे सोसायटीतील बाकीच्या लोकांना कशाला निमंत्रण द्यायचे रे... ?

आता तुम्हीच बघा काय करायच ते... ह्या संधीचा लाभ घेण्यासाठी म्हणून आपले शेजारी येऊन... "सेल्फी विथ भागवत " घेऊन... जात आहेत आपल्याच घरचा चहा पिऊन !!!

बाबा sss हे सुरु झाल्यापासून पासून ५ लिटर दूध आणि २ किलो साखर नव्याने आणावी लागली मला वाण्याकडून.

अरे यार,... " बर फोन ठेव आम्ही आलोच घरी ". असे सांगून सरांनी फोन कट केला.

म्हणजे पहा ह्या भागवत कडून आणलेला एक जुना "गुलाबी पायजमा " गोरे साहेबांना किती महागात पडला... म्हणून कधी कुणाची वस्तू आणली तर न विसरता वेळेत परत करावी नाहीतर अशी विनाकारण भरपाई करावी लागेल.

# सेल्फी विथ स्विट कॉर्न !!!



मी कधी साहेबांवर चिडत नाही पण आज चिडलो आणि विचारलं अहो साहेब काय गरज होती त्या मूर्ख माणसाचा पायजमा आणायची? किती महागात पडले हे प्रकरण आता द्या साऱ्या सोसायटीचे कपडे इस्त्री करून.

अरे बाबा वेळच तशी आली होती म्हणून घ्यावी लागली मदत त्याची... माझ्या डोळ्यासमोर तो क्षण आजही तसाच

दिसतो कारण त्यात माझ्यासोबत थोडी भागवत ची सुद्धा चूक होती...

काय... त्याची सुद्धा चूक होती?

हो... मी वॉशरूमला गेल्यावर पायजम्याची नाडी सुटत नाहीये म्हणून तिथे बाजूलाच दुकानात झोपलेल्या भागवतला मी मदत मागीतली परंतु तो नशेत होता त्यामुळे नाडी कापताना गडबडीत त्याने नाडीसोबत माझी पायजमा सुद्धा थोडी कापली होती.

तरीच, " नाहीतर ओळख नसताना त्याने तुम्हाला का पायजमा दिला? " हा प्रश्न मला सतावत होताच.

मी त्याच्या दुकानातील एक पायजमा परिधान करून भाषण दिले... वाटले नव्हते तो जुना पायजमा वेळेवर परत मिळाला नसल्यामुळे दारुडा भागवत मला शोधत घरी पोहचेल.

आपण वेळ मारून नेण्यासाठी भागवत फुकट कपडे इस्त्री करू देण्यासाठी आला आहे असे खोटे सांगितले . परंतु हि चाल आपल्याला खूप महागात पडली आहे. त्याचे खरे कारण

" जुना पायजमा त्याच्याकडून का आणला " म्हणून बायको ओरडेल याबद्दल असणारी भीती.

हो... आपण एक खोटे लपविण्यासाठी अनेक खोट्या कुबड्या वापरल्या आहेत... आता आपण घरी जाऊन बायकोला खरे-खरे सांगून सोसायटीतील लोकांची इस्त्री साठी आलेली सर्व वस्त्रे परत करू आणि त्या भागवतला त्याची पायजमा देऊन हाकलून लावू. इथून पुढे, " प्राण गेला तरी चालेल पण कधीही खोटे बोलायचे नाही ".

आम्ही असे छान-छान संकल्प करून माझ्या घरातून निघालो परंतु आजपर्यंतचा स्वानुभव, " आपल्या मनात संकल्प कितीही छान असतील तरी प्रत्यक्षात त्याची मातीच होते ".

दुपारचे २ वाजले होते सरांच्या घरी पोहचलो, सोसायटीमध्ये शांतता होती शिवाय घरातही लोड शेडिंग मुळे लाईट नाहीये म्हणून कपडे इस्त्री करून दमलेला भागवत जेवण करून निवांत झोपलेला.

आम्ही भागवत ची झोप मोड होऊ नये म्हणून एका स्वतंत्र रूममध्ये गेलो... वाटले होते की, शांततेत चर्चा करून काहीतरी

मार्ग काढण्यात येईल... परंतु चर्चेचं रूपांतर भांडणात कधी झाले हे समजलेच नाही.

साहेब आज जसे काही ठरवून आले आहेत असेच बोलत होते... नाही sss नाही.. खर तर ओरडत होते बायकोवर... त्यांनी सुरुवातच इतकी स्फोटक केली होती कि पाहून मी सुन्न झालो... ते म्हणाले... !

तू मला एक सांग ६ महिन्यांपूर्वी घेतलेली, " स्वीट सेल्फी विथ स्विट कॉर्न " विसरलीस का तू? बोल ना, अग बाई... विसरलीस का तू?

मी आपले नवरा बायकोच्या मध्ये काय बोलावं म्हणून शांत उभा...

अरे तुला आठवतय का? मागे आपण आमच्या गावा कडे गेलो होतो.

मी म्हणालो, हो हो कसा विसरेन... ते शेत... ते तुमचे थोरले भाऊ... ती कणसे...

म्हणजे मग तुला त्यादिवशी आपण दिवसभर काय काम केले होते हे आठवतच असेल... ?

हो आपन दिवसभर तुमच्या शेतात मक्याची कणसे तोडत होतो... कसा विसरेन माझ्या हाताला चरे पडले होते साहेब त्या दिवशी.

फक्त तुझ्याच नाही तर माझ्या हाताची सुद्धा कातडी लाल झाली होती.



हो बरोबर आहे, शेतात काम करणे सोपे नाही साहेब... पण त्याचा आज इथं काय संबंध?

त्या दिवशी येताना माझ्या थोरल्या भावाने आपल्या कार च्या डिक्कीमध्ये आणि कारमध्ये... आपण दोघे बसायला थोडी जागा सोडून उरलेल्या जागेत ट्रॅक्टर च्या ट्रॉलीत भरतात तशी गच्च भरून मक्याची कणसे दिली होती.

हो साहेब आणि ते म्हणाले होते की, " उद्या सकाळी मी मोटार-सायकल वर पुण्यात येईन मग मार्केट यार्डात जाऊन हि कणसे विकून टाकू ".

मी कसा विसरेन तो कणसांसोबत झालेला प्रवास, एखादं भिजलेलं माकड बसते ना उन्हात तसे त्या कणसाच्या ढिगाऱ्यात बसलो होतो मी तुमच्या बाजूला कारमध्ये .

हो अगदी बरोबर आठवतय तुला... पण पुढे काय झाले याचा तुला अंदाज हि नसेल... !

मला फक्त हे समजलं नव्हतं... दिवसभर इतकं काम करून हि... " तुम्ही मला ४ सुद्धा कणसे दिली नव्हती ".

अरे कसा देणार बाबा तुला ४ कणसे, माझ्या घरात जर असतील असली आगाऊ माणसे?

मॅम म्हणाल्या, " मी काही अडविले नव्हते तुम्हाला कणसे देण्यापासून, उगी उठ-सूट टोमणे मारू नका ".

साहेब मला वाटलेले की, दुसऱ्या दिवशी सकाळी तुम्ही मला मार्केट यार्डात सोबत यायला सांगाल... पण तुम्ही तर " ऑफिसला वेळेत ये " असा मेसेज टाकलेला.

तुला कणसे का दिली नाहीत ते बाईसाहेबांना विचार... !

मॅम म्हणाल्या, " अहो त्याच काय झालं... "... इतकंच बोलतायत तर साहेब अचानक गरजले, " सरळ सांग ना नवऱ्याने सगळी कणसे खाल्ली त्यामुळे दिली नाहीत म्हणून !".

अहो, " तुम्ही काही वाट्टेल ते बोलू नका, उगी मी ऐकून घेतेय म्हणून "... झाली असेल एखादी चूक... !

चूक... ह्याला चूक म्हणतात का घोडचूक? आणि परत आज केली ती हत्ती चूक?... चूक म्हणे चूक... !

साहेबांचा असा हा रुद्र अवतार पाहून मला काही सुचत नव्हते, पण काहीतरी बोलणे भाग होते... नाहीतर हे दोघे एकमेकांचा खून करतील अशी परिस्थिती निर्माण झालेली... म्हणून मी म्हणालो, " अहो साहेब जाऊ द्या मला वाटलं दुसऱ्या दिवशी सकाळी तुम्ही आणि तुमच्या थोरल्या भावाने ती सर्व कणसे विकली "

अरे विकली का फुकटात खपली ते ह्या बाईला विचार?

आता माझ्यात कुठली हिम्मत मॅमला काही विचारायची... मी आपलं फक्त नजरेनेच त्यांना विचारायचा प्रयत्न केला.

अहो, " त्याच असे झाले... "... मी मध्येच मॅमला थांबवून सरांना म्हणालो, " साहेब तुम्ही आता मध्ये बोलू नका please... " मला " त्याच असे झाले... " याच्या पुढचं जरा ऐकू द्या.

त्या म्हणाल्या, " त्याच असे झाले... मला वाटले की, नेहमी प्रमाणे शेतातून आणलेला माल (रानमेवा ) शेजार-पाजाऱ्यांना थोडा-थोडा देण्यासाठी आणला असेल ."

" तुला ना मी आता sss ", असे म्हणत साहेब परत मॅम च्या दिशेने बुक्की उगारत धावून आले.

तिला तू आधी विचार की, " नवऱ्याने ती कणसे वाटायला आणली आहेत ह्याबद्दल एक शब्द तरी काढला होता का? ".

मी साहेबांना पहिल्यांदा सनी देवल सारखे चिडलेले पाहत होतो, "खरंच त्यादिवशी त्यांच्याकडे पाहून मला तो घातक सिनेमातला काशी जसा कातिया च्या अंगावर चिडून जातो तसे

वाटत होते... तीच डोळयात आग... आणि वळलेली मूठ "...
मी आपला शांत पणे उभा होतो.

आत्ता पर्यंत साहेब म्हणायचे, " तू तिला विचार " परंतु आता मॅम सुद्धा, " तुम्ही ह्यांना विचारा " म्हणू लागल्या... !

ह्यांना विचारा की, तुम्हाला आज त्या कणसाची कशी काय आठवण झाली? आणि आपण शुगर व बी.पी चे रुग्ण असूनही इतके चिडायला काय झालय?

खरे तर मी दोघांनाही काहीही विचारात नव्हतो... फक्त नजर टाकायचो आणि हे सुरु व्हायचे खेळण्यातल्या चावी दिलेल्या माकडाप्रमाणे.

तू म्हणतेय ना, " मला आज त्या कणसाची कशी काय आठवण झाली? ". अग मला हाच प्रश्न तुला विचारायचा आहे की, त्या कणसांची तुला का आठवण नाही झाली आज? बोल ना आता उघड तोंड?

मी कन्फयुज होतो... आता काहीतरी बोलावं म्हणून मी, "साहेब शांत व्हा, मला अजिबात काहीही समजत नाहीये ss तुम्ही का भांडत आहात याबद्दल... "

साहेब म्हणाले, " अरे उगी सॅम्पल म्हणून मी फक्त मोजून १० कणसे घरात घेऊन आलो... त्यापैकी ५ सोलून मीठ टाकून शिजवायला टाकली कुकरमध्ये.

मग? ?

मग काय, दिवसभर शेतात राबून थकलोय म्हणून आता निवांत एखादी गजल लावून, " शिजवलेली कणसे आणि आपण " असा माहोल करण्याचा मनात बेत आखला होता... पण ह्या बाईने तो आखलेला बेत उलटवून लावला रे ..!

का काय झालं?

मी उरलेली ५ कणसे पोराला आवडतात म्हणून सोलत होतो... इतक्यात ह्या बाईने सेल्फी काढला त्या कणसांसोबत.

त्यात एव्हडं काय चिडण्यासारखं झालं साहेब?

अरे इतक्यात आमचे पुत्र रत्न लगेच बोलले, "अग मम्मा ह्या ५ कणसांसोबत काय स्मॉल सेल्फी काढतेय? आपल्या कारमध्ये अंदाजे ५०० कणसे आहेत, बेटर यु ट्राय सेल्फी विथ ऑल ", "मी आत्ताच पाहून आलो आणि सोसायटीतील सर्व लहान मुले पण आपल्या कारच्या बाजूला जमले आहेत !"...

आता अश्या सेल्फी ची आईडिया देणाऱ्या पोराला काय बोलणार सांग?

ओ बाबा त्यात माझी काय चूक? आम्ही आपले खाली खेळत होतो... आणि हो सर्व मुलांनी माझ्या अगोदरच कार मधली कणसे पाहिली होती... एव्हडी काळजी होती त्या कणसांची तर कव्हर का नाही घातल कार ला?

अरे बेटा असे बोलू नये... तुझे बाबा आहेत ना ते?... बर मग मॅम कार कडे गेल्या का सेल्फी काढायाला?

नाही... हिने घरात काढलेली कणसां सोबतची सेल्फी. “Sweet Selfy with Sweet Corns” ह्या नावाने भली मोठी पोस्ट लिहून आजच्या ह्या "सेल्फी विथ भागवत " प्रमाणे सोसायटीच्या ग्रुप वर पोस्ट केली... काय गरज होती का? ?

अरे देवा मग हो सर?

आमच्या सोसायटीतील सर्व भुक्कड सदा-उपाशी लोक १०-१५ मिनिटात हातातले काम सोडून... कुणीतरी मोठा सेलिब्रिटी आल्याप्रमाणे आमच्या घरी कणस मागण्यासाठी जमा झाले.

काय कणसे मागायला?

सरांचा पोरगा म्हणाला, हो कारण तो मेसेज मीच मम्माला लिहून दिलेला... त्यात असे लिहिले होते,

“Come on Hurry Up" take a “Sweet Selfy with Sweet Corns” and "Grab 5 corns each family, don’t miss the grand opportunity".

सर म्हणाले, " मग काय हे हपापलेले लोक सोडतात का हि चालून आलेली संधी? "

बाप रे.. साहेब.. तुमचे घर भरले असेल लोकांनी?

त्यावर साहेबांचा मुलगा, "अहो त्या दिवशी आमच्या घरात जालियनवाला हत्याकांडची पुनरावृत्ती होणार होती... कारण एकाच दरवाज्यातून असंख्य लोक एकाच वेळी आले होते मात्र जाणार कसे? "

त्यावर तोडगा कसा काढला?

शेवटी कार ची चावी मम्मा कडे दिली आणि ह्या जमलेल्या तमाम नागरिकांपैकी कुणी चेंगरा-चेंगरीमध्ये मारला जाऊ नये... म्हणून सोसायटीच्या सिक्युरिटीला बोलावून...

सर्वांची व्यवस्थित शिस्तबद्द रांग लावली आणि आमचे " जनरल डायर " सॉरी sss आमचे बाबा हळू-हळू लोकांना खाली सोडत राहिले.

काय हे साहेब? काय-काय होतंय तुमच्यासोबत?

अरे त्यात एक अती-उत्साही कार्यकर्ता वायरलेस माईक आणि स्पीकर गळयात अडकवून अनाऊन्समेंट करू लागला... !!!,

"सर्वांना कणसे मिळतील... कृपया प्रत्येक फॅमिली मधील फक्त एकाच व्यक्तीने ह्या योजनेचा लाभ घ्यावा, जर एका फॅमिली मधील एका पेक्षा जास्त मेम्बर्स रांगेत उभे असतील तर कृपया रांगेतून बाहेर व्हा अन्यथा अपमान केला जाईल... प्रत्येक फॅमिलीला फक्त ५ कणसे मिळतील... तेंव्हा सहकार्य करा... !"

म्हणजे ती सर्व कणसे त्या दिवशी चक्क तुम्ही ह्या ७० फॅमिलीमध्ये वाटून टाकली?

फक्त कणसे च नाही... अरे त्या गडबडीत कुणीतरी माझ्या कार च्या डिक्की मधून टूल-किट सुद्धा घेऊन गेलाय रे... !

सर हि तुमची सोसायटी आहे का चोर बाजार? एक से बढकर एक भिकारी भरलेत नुसते... ! ह्यापेक्षा झोपडपट्टी परवडली राव !

हो सर्वजण भिकारी आहेत... एक वयस्कर (above 80) नवरा-बायको आमच्या समोर राहतात... तोंडात अजिबात दात नाहीयेत तरीही कणसे खायची हौस खूप... ते तर दोघे त्यादिवशी पासून माझ्या डोक्यातच बसलेत sss कारण त्यांनी त्या दिवशी आमच्या किचनमध्ये घुसून मी शिजवून ठेवलेली पाचही कणसे लंपास केली.

म्हणजे सर तुम्ही आखलेला बेत... तो माहोल... सर्वकाही कॅन्सल केलं त्या दोघांनी? कठीण आहे हे सर्व... !

महाकठीण आहे ह्या आमच्या सोसायटीमध्ये राहणे म्हणजे... !

साहेब म्हणजे, " आता फक्त ५ कणसे तुमच्या घरी उरले असतील? ".

इतक्यात सरांचा पोरगा म्हणाला, " ते उरलेले ५ कॉर्न्स सिक्युरिटी काका घेऊन गेले".

साहेब म्हणाले, पाच नाही शून्य... !! हो... " झिरो कॉर्न्स विथ लॉट्स ऑफ फालतू सेल्फीज "... !

हे वाक्य ऐकून का कुणास ठाऊक माझ्या तोंडातून, " जय हरी... पांडुरंग हरी " हे शब्द बाहेर पडले.

पुढे सर म्हणाले, " शेवटी माझ्या भावाला फोन करून सांगितले की, उद्या तू येऊ नकोस कारण मी सर्व कणसे विकली". खरे तर फक्त सोल-लेल्या ५ कणसांची आवरणे उरली होती हातात... !!!

बेशरम पणाची हद्द म्हणजे काहीजण दुसऱ्या दिवशी सकाळी, " आम्हाला कणसे मिळाली नाहीत " अशी तक्रार घेऊन आले होते.

खरे तर आता माझ्याकडील सांत्वन करण्यासाठी वापरली जाणारी शब्दसामुग्री संपली होती... तरीही शेवटी... सर सॉरी... असू द्या होत असं कधी कधी ..असे मला म्हणावे लागले.

अरे, " माणूस एकदा पोळले असेल तर, ताक सुद्धा फुंकून पितो " असे म्हणतात, पण तो नियम आमच्या घरी लागू होत नाही.

असू द्या साहेब तुम्ही शांत व्हा, " आपण आता भूतकाळात काय झाले ते विसरून, आज आपल्या समोर जे हे भागवत नावाचे प्रकरण आहे ते सोडवू ".

इतक्यात मला एक फोन आला म्हणून मी बोलत-बोलत गॅलरीमध्ये जात असताना सहज पाहिले... तर हा भागवत निवांत शांत पांघरून घेऊन झोपलेला होता... आणि साहेब मात्र बायको सोबत भांडणात व्यस्त होते... !...

" जय हरी... पांडुरंग हरी ! "

# कोकम... !




लोड शेडींग मुळे गेलेली लाईट ५ वाजता येणार असल्यामुळे ह्या गोरे साहेबांचे आणि बायकोचे भांडण अतिशय संथ गतीने सुरु होते. सकाळपासून साहेबांच्या घरातील सर्व कपडे इस्त्री करून थकलेला भागवत बाजूच्या रूममध्ये निवांत झोपलेला. माझी मात्र पंचायत झालेली एकतर मी खूप दमलो होतो त्यातून ह्यांच्या दोघांच्या उणे -दुणे काढण्याच्या शर्यतीमध्ये कुणीही थकण्यास तयार नव्हते . मला

आता ह्यांचे भांडण लवकर संपवून घरी जाऊन झोपायची गरज होती पण हे भांडण मारुतीच्या शेपटीसारखे वाढतच चालले होते. ह्या दोघांना समजून सांगण्यासाठीचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरत होते. काहीही करून सोसायटीतील लोकांकडून फुकट इस्त्री करून देण्यासाठी म्हणून जमा केलेले कपडे परत करून ह्या भागवतला हाकलून लावणे माझ्यासाठी अत्यंत गरजेचे होते.

शेवटी मी धाडस करून विचारले की, " मॅम,... आता आपण ह्या सर्व कपड्याना प्रेस करून द्यायचे कि, तसेच परत करायचे ह्यावर थोडा विचार करूयात का? " .

त्यावर मॅम चे उत्तर हे असे, " आता मी काय सांगू? "

साहेब, तुम्ही उरलेले भांडण नंतर करा... आत्ता थोडे सहकार्य करा आणि हे वाढलेले भागवत प्रकरण थांबवा... , नाहीतर मी आता निघून जाईन तुमचे काम सोडून कायमचा... खूप वैताग आलाय मला.

आता मी तर काय सांगू मलाही काही सुचत नाहीये, " आता ह्या जमा केलेल्या कपड्यांचे करायचे तरी काय?

आमच्या मुलासोबत सर्वांचे कपडे रिटर्न पाठवून देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही ".

" ओ बाबा, आता ते शक्य नाही ", सरांचे पुत्ररत्न उदगारले,

का... का... शक्य नाही?

आता ते शक्य नाही कारण सोसायटीतील कितीतरी सभासदांनी, "थँक यू " चे मेसेज केले आहेत आणि मम्मा ने त्यावर "always welcome " असा रिप्लाय पण दिला आहे... त्यामुळे आता हा आपल्या ‘प्रेस्टीजचा विषय ’ बनलाय... !

इतक्यात मॅम म्हणाल्या, "शिवाय सर्वांनी गोरे साहेब आणि फॅमिली चा सत्कार करण्याचा ठराव केला आहे, कदाचित तुम्हाला सोसायटी चे सेक्रेटरी पद देण्याबद्दल एकमत झालं असल्यामुळे तुमचा फोटो सुद्धा कट आऊट (होर्डिंग) बनविण्यासाठी म्हणून सोबत घेऊन गेले आहेत ..! "

त्यांनी मागितला आणि तू फोटो दिला?

हो दिला... !

कोणता फोटो दिला?

मला आता ह्या फोटो वरून नवीन वाद ऐकण्याची अजिबात इच्छा नव्हती... त्यामुळे मी सरांना विंनती केली की, " साहेब आता नवीन भांडण सुरु करू नका, पुढे काय करायचं ते सांगा ".

ह्या बाईला खूप घाई रे... !

असो... मला आता ' बाई आणि घाई ' ह्याबद्दल काहीही सांगू नका... ok ..! तसेही तुम्हाला सोसायटी चे सेक्रेटरी होण्याची बऱ्याच वर्षांपासूनची इच्छा होतीच... आता समोरून चालून आलेली संधी तुम्ही काय सोडताय का? मग 'प्रेस्टीजचा प्रश्न' या शब्दांखाली द्या करून सर्वांच्या कापडांना इस्त्री.

तसे काही नाहीये... !

सरांचा पोरगा इतक्यात एखाद्या रिपोर्टर सारखा, " बर बाबा तुम्हाला काय वाटतंय? म्हणजे.. आता हि एक संधी मिळाली आहे सेक्रेटरी होण्याची... त्याचा योग्य वापर करावा असे तुमच्या मनात आहे का? "

अरे... " सेक्रेटरी वगैरे मला अजिबात व्हायचं नाहीये.."... " ह्या लोकांचे कपडे ह्यांच्या तोंडावर इस्त्री न करताच कसा फेकून मारतो ते बघ नुसते तू आता sss ".

शिवाय ह्या भागवतला लाथा घालून घराबाहेर काढतो कि नाही ते बघ sss... झोपलाय बघ कसा एखाद्या राजकुमारा-सारखा घोरत निवांत .

साहेब तुम्ही जास्त चीड-चीड करू नका अगोदरच तुमची तबियेत बरोबर नाहीये .

तबियेतीच सोड रे... जर समजा ‘प्रेस्टीजचा प्रश्न’ म्हणून आपणाला सर्वांचे कपडे प्रेस करूनच द्यायची वेळ आली तर सर्व कपडे इस्त्री करू देण्यासाठी ह्या भागवतला कसे पटवायचे ते बघ? .

तुम्ही त्याची काळजी करू नका... कपडे इस्त्री मारायचे म्हणजे त्याच नेहमीच कामच आहे... फक्त तुम्ही त्याला पैसे देण्याची तयारी ठेवा.

महत्वाची गोष्ट म्हणजे, अशा प्रकारच्या निष्फळ वाटाघाटी सुरू असताना सुद्धा... सोसायटीतीतील सभासद मंडळी अधून-मधून येऊन उपद्रव देण्यास कुठेही कमी पडले नाहीत.

एक से बढकर एक नमुने... म्हणजे ते म्हणतात ना, "एकाला झाकावा अन दुसऱ्याला काढावा " अशी परिस्थिती होती.

आज आपल्याला फुकट कपडे इस्त्री करून मिळणार म्हणून दर ५ मिनिटाला कुणीतरी शेजारी तोंडावर खोटे हास्य आणि ५ जोडे कपडे घेऊन यायचाच त्रास द्यायला.

प्रत्येक वेळी आम्ही आमचे सुरु असणारे भांडणरूपी निष्फळ चर्चासत्र अर्धवट ठेवून... रूम मधून बाहेर यायचो आणि त्रास द्यायला आलेल्या शेजाऱ्याचे निर्विकार चेहे-यानं स्वागत करायचो. शिवाय शिदोरी म्हणून इस्त्री करण्यासाठी आणलेले त्याचे कपडे जमा करून घेऊन... त्याला चहा-पाणी करून परत पाठवायचो.

त्यामध्ये एक "कुलकर्णी सर " नावाचे शिक्षक आले अन येताच म्हणाले, "गोरे साहेब तुमच्या अत्यंत सुंदर अश्या विनामूल्य कपडे इस्त्री करून देण्याच्या उपक्रमास अगदी मनःपूर्वक शुभेच्छा !!! "

आमचे साहेब लगेच,"धन्यवाद आदरणीय कुलकर्णी सर".

माझ्या माहितीप्रमाणे, " समोरचा माणूस करीत असलेली आपली स्तुती खरी नाही, कार्यसाधूपणाची आहे, हे समजत असलं तरीही जगातील ८५ % लोक अश्या स्तुतीला बळी पडतात ", त्याचप्रमाणे आमचे साहेब बळी पडताना दिसत होते... पण काय करणार?

मास्तर पुढे कौतुकाने सांगत होते की, " तुमच्या सौ. नी लिहिलेला फोन वरील संदेश पाहिला आणि शाळेतील हेड मास्तरांची तत्काळ भेट घेऊन तुमच्या उपक्रमा बद्दल माहिती दिली".

त्यावर साहेब म्हणाले, "अच्छा अच्छा... म्हणजे आमच्या ह्या छोट्याश्या " शेजारधर्म " करण्याच्या खटाटोपाला आपण शाळेत " उपक्रम " असे नामकरण करून आलात कुलकर्णी सर? "

कुलकर्णी मास्तर अगदी विनम्रपणे, " हो ते तर आमचे अहोभाग्य sss ! ". शिवाय ५ जोड कपडे तुम्हाला इस्त्री करण्यासाठी देऊन तुमच्या स्तुत्त्य उपक्रमासाठी योगदान देता यावे म्हणून, " मी माझी अर्ध्या दिवसाची सुट्टी मंजूर करावी

अशी वलग्ना हेड मास्तरांकडे केली असता त्यांनी आम्हास आनंदाने मंजुरी सुद्धा दिली ".

साहेब आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "... . काय सांगताय काय?... तुमच्या शाळेतील हेड मास्तरांनी अर्ध्या दिवसाची सुट्टी मंजूर केली... ?

तर तर... तुमच्या सारखे हरहुन्नरी व्यक्तिम समाजातील चुरगळून पडलेल्या कपड्याना इस्त्री करून देण्यासारखे महान कार्य करत असताना... आमचे मन शाळेत कसे बरे रमेल? त्यामुळे तुमच्या उपक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी शाळेतील हेड मास्तर साहेबांनी सुद्धा त्यांचे ५ जोडे वस्त्र इस्त्री करण्यासाठी आमच्या सोबत पाठवून दिले आहेत... हे पहा... !

साला... , हा कुलकर्णी मास्तर असं काही तोंडावर आव आणून बोलत होता ना... की मला आमच्या विद्यापीठाच्या युथ फेस्टिव्हलमध्ये केलेल्या देशभक्तीपर नाटकातील माझ्या दादासाहेब ह्या स्वातंत्र्य सैनिक पात्राची आठवण येऊ लागली... " देशाच्या स्वातंत्र्यासाठी देह ठेवला आम्ही... sss "... असेच काहीतरी डायलॉग होते त्यात माझे.

मी म्हणालो, "मास्तर धन्य ती शाळा आणि धन्य ते तुमच्या शाळेतील हेड मास्तर !! " ( मनातल्या मनात ) .

इतक्यात मॅम म्हणाल्या, " असू द्या कुलकर्णी सर ठेवा ते कपडे भागवत देईल प्रेस करून ".

आता साहेब चिडले होते पण तरीही 'प्रेस्टीजचा प्रश्न' म्हणून, " कुलकर्णी सर तुम्ही चहा घेणार की दूध चालेल? "

सरांचा मुलगा हळूच म्हणे, " बाबा घरातील चहा पाऊडर सकाळपासून बरेच पाहुणे आलेले त्यामुळे संपली आहे ". त्यामुळे उगी माहिती नसताना, " खिशात नाही दमडा अन खायला पाहिजे कोंबडा !! " असे वागू नका.

त्यावर कुलकर्णी मास्तर, "अच्छा अच्छा मग आम्ही दूध प्राशन करण्यास तयार आहोत"

बाबा, " मम्मा नी ह्या मोठ्या टाकीमध्ये जवळ-जवळ ३० -४० लिटर कोकम सरबत बनवून ठेवला आहे, कारण दूध सुद्धा संपले आहे... ! ".

मास्तर पुढे म्हणाले, "वाह वाह उत्तम, आमचे आजोबा सांगायचे, " जो पितो कोकम त्याच्या जीवनात राहणार नाही

जोखम "... पोरा ३-४ ग्लास कोकम दिले तरी प्राशन करेन... कारण कोकम हे आपल्या लिव्हर चे औषध असते रे... !

गोरे साहेब तुम्हाला सांगतो, "तुमचे हे शेजारील लोकांवर असणारे प्रेम पाहून मन अगदी भरून येते आमुचे... "... येत्या रविवारी मिटिंगमध्ये, " तुमच्या विनामूल्य कपडे इस्त्री करून देण्याच्या उपक्रमा बद्दल बाकी सर्व सभासदांच्या डोळयात अंजन घालण्यासाठी मी भाषण देणार आहे.

साहेब म्हणाले, " अहो कुलकर्णी सर... मी काय नेता नाहीये... कशाला भाषण वगैरे sss मी आपला छोटा माणूस आहे "

गोरे हा तुमच्या मनाचा मोठेपणा... ! भाषण तर देणारच sss शिवाय आजवर सोसायटीसाठी आपण दिलेल्या योगदानाबद्दल दरवर्षी " ले. ले संस्थान " यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा " समाजभूषण कर्नल खाजवे पुरस्कार " तुम्हालाच प्रदान करावा यासाठी महाराष्ट्र सरकारकडे शिफारस पत्र सादर करण्याचा अमुचा मनसुबा आहे. "

बाप रे... ! हे कुलकर्णी मास्तर, घरात बोलताना सुद्धा असे भाषण दिल्यासारखेच बोलत असतील का? आणि बोलत

असतील तर त्यांच्या बायकोची काय अवस्था होत असेल? असे काही प्रश्न माझ्या मेंदूला स्पर्श करून गेले.

आम्ही सुद्धा ह्या पोपटाला एकदाची कोकम ढोसायला देऊन हाकलून लावू असा मनसुबा करून... मास्तरच्या हातात जरा जास्तच बर्फ मिक्स केलेला कोकम चा ग्लास दिला. मास्तर दिलेला ग्लास रिचवून अजून कोकम मागणार ह्याबद्दल अंदाज होताच त्यामुळे एका जुन्या कळकट बिसलरी बॉटलमध्ये एक लिटर कोकम पार्सल देण्याच्या हेतूने भरून ठेवला.

मास्तर कोकम ढोसून झाल्यावर, "कोकम प्राशन केल्यामुळे माझा जठराग्नी कसा शांत झाला... बेटा... अजून द्यावा एखादा ग्लास "

मास्तर, " हि घ्या अक्खी बाटली आणि थंड आहे तोपर्यंत घरी जाऊन कुलकर्णी मॅम सोबत घोट -घोट प्राशन करा म्हणजे त्यांचाही जठराग्नी शांत होईल... ! "

बर मी निघतो... आणि हो शाळेतील हेड मास्तरांचे कपडे म्हणजे जोखमीचं काम त्यामुळे नीट इस्त्री करावेत ही नम्र विनंती... !!

मास्तर बाटली घेऊन गेले आणि ५ मिनिटातच शेजारी राहणारा आणखी एक इसम आम्हाला दारातूनच टोचे मारू लागला... तो म्हणाला... !

" गोरे साहेब मी तुमच्याकडे कपडे देण्यासाठी अथवा सेल्फी घेण्यासाठी आलेलो नसून फक्त एक " एक्सचेंज ऑफर " घेऊन आलोय... ! "

साहेब म्हणाले, "काय कसली एक्सचेंज ऑफर घेऊन आलात? "

अहो माझ्या बायकोने चुकून गडबडीत न धुतलेला ड्रेस तुमच्याकडे इस्त्री करण्यासाठी जमा केलेला आहे तो बदलून दुसरा देण्यासाठी आलोय बाकी काही नाही... !

क्षणभर वाटले की sss त्याला एक कानाखाली देऊन विचारावं कि, " अरे ये sss हे काय दुकान आहे का बदलून घेण्यासाठी आला आहेस थेरड्या? " पण करणार काय काहीच करू शकत नव्हतो.

कारण साहेब अशाही अर्धवट माणसाला एखादे कमळ जसे काटेदार भुंग्याला आपल्यामध्ये सामावून घेते तसेच

समजून घेत होते. साहेबांनी त्याला त्याचा ड्रेस बदलून देऊन त्याच्या नरड्यात कोकम ओतून प्रसन्न मुद्रेने रवाना केले.

साहेब तो भुंगा गेल्यानंतर बायकोवर खूप ओरडले, "अग ये अडाणी तुला काही डोकं आहे कि नाही? एकतर ह्या गाढवांना फुकटात कपडे इस्त्री करून द्या sss शिवाय वरून त्यांना चहा-पाणी करा... अग चहा-पाणी इथवर ठीक आहे ग sss !!! पण कोकम? ? ? तू मला सांग, " मी काम करतोय कि दरोडे घालतोय? " म्हणून तू इतके पैसे विनाकारण उधळत आहेस? "

अहो ते बरे दिसते का? " आपल्या घरी कुणी आले आणि त्यांना काही चहा-पाणी न करता परत पाठविलय ", शिवाय तुम्हीच नेहमी म्हणता, " आपल्या 'प्रेस्टीजचा प्रश्न' "

त्या ' प्रेस्टीज 'ला घाल चुलीत sss उद्या म्हणशील ' प्रेस्टीजचा प्रश्न ' म्हणून चहा-पाणी-कोकम कशाला? ? ? एखादे बोकड कापू म्हणजे येना -जाणाऱ्या शेजाऱ्यांना एक-एक वाटी मटण आणि सेल्फी विथ बोकड देता येईल . ' प्रेस्टीज ' म्हणे ' प्रेस्टीज ' साला कुठून हा असला दगड माझ्या गळ्यात बांधला आमच्या मामाने देव जाणे... !!!

मॅमला दगड म्हणताच त्या रडत-रडत बेडरूममध्ये जाऊन चक्क झोपल्या. आता उरलेली सर्व ब्याटिंग मला आणि साहेबांनाच करावी लागणार होती.

एका पठ्ठयाने तर फोन केला, "गोरे साहेब तुमच्या फुकट इस्त्री करून देण्याच्या उपक्रमा बद्दल मी आपल्या वार्डाच्या नगरसेवकाला कल्पना दिली sssत्यामुळे ते स्वतः तूम्हाला भेटण्यासाठी येत आहेत... तेंव्हा तुम्ही तयार रहा... आणि हो आपले नगरसेवक सुद्धा sss तुम्हाला पाठिंबा देण्यासाठी म्हणून ५ जोड कपडे घेऊन येत आहेत... !" आणि हो नगरसेवकांचे कपडे म्हणजे जोखमीचं काम त्यामुळे नीट इस्त्री करा... !!

आता काय बोंबलाव का?

मला तर खरंच हे प्रकरण खूप असहय वाटत होते sss थोड्या वेळासाठी मी एखाद्या धोब्याच्या दुकानात कामाला आहे की काय अशी शंका वाटू लागली होती. कारण .. फोनची रिंग वाजू अथवा दाराची बेल वाजू कपड्यांच्या देवाण-घेवाण शिवाय दुसरे काही विषयच नव्हते.

इतक्यात बेल वाजली... पाहतो तर समोर राहणारे वयस्कर आजी-आजोबा ५ जोड कपडे हातात घेऊन उभे... आता ह्या

आगाऊ झोडप्याला कोकम पिल्यावर त्रास होतो sss म्हणून कोकम च्या बदल्यात दुसरे काहीतरी द्यावे अशी विनंती करण्यासाठी ह्यांनी सरांच्या बायकोला झोपेतून उठविले... जसे काही उपकारच करत आहेत म्हणून डिमांड करायला ह्यांना लाज कशी वाटली नाही... ह्याचे मला आजही नवल वाटते...!

सरांचा पोरगा, "आजोबा तुम्हा दोघांना आईसक्रिम चालेल का? "

"हो .. हो... चालेल ना ह्या वयात कोकम पेक्षा आईसक्रिम बरे .! "

अशाप्रकारे सोसायटीतील उरलेल्या सर्व लोकांना, " कोकम देत आणि त्यांच्या कापडांची ज़ोखम घेत " आम्ही आमची फालतूची ' प्रेस्टीज ' सांभाळली.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.



मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वत:ही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com